**बिसेन डेन्टल केअर**

डॉ.दिप(पंकज) बिसेन   डॉ.खुशबू बिसेन(पटले)



दंत व मुख रोगविशेषज्ञ

बी.डी.एस.(नागपूर)



ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया

सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०



साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे






गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर व साठवणे एजंसी जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध



आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१६ गोंदिया | अंक ३७ | बुधवार, दि.१९ ते २५ ऑगस्ट २०२६ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/104/2025-2027


## "महा वॉकेथॉन-वॉक फॉर वॉटर"मध्ये मोठ्या संख्येने सहभागी व्हा; जलदूत बनून पाण्यासाठी चालूया

### जलसंधारण दिनानिमित्त मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे राज्यातील नागरिकांना आवाहन




**मुंबई :-** आपला महाराष्ट्र समृद्ध आणि हिरवागार असावा, हे आपल्या सर्वांचे स्वप्न आहे. राज्याचे माजी मुख्यमंत्री दिवंगत सुधाकरराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त २१ ऑगस्ट रोजी संपूर्ण राज्यात "जलसंधारण दिन' साजरा करण्यात येतो. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील नागरिकांना जलसंधारणाच्या या जनजागृती अभियानात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.

२१ ऑगस्ट रोजी सकाळी राज्यातील सर्व ३६ जिल्ह्यांमध्ये "महा वॉकेथॉन- वॉक फॉर वॉटर'चे आयोजन करण्यात आले आहे. या वॉकेथॉनमध्ये तरुणांसह सर्व नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन जलसंधारणाचा संदेश जनतेपर्यंत पोहोचवावा, असे आवाहन मुख्यमंत्री फडणवीस यांनी केले आहे.

जलसंधारणाचा संदेश प्रभावीपणे युवा पिढीपर्यंत पोहोचविण्यासाठी रील्स स्पर्धेचेही आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेत युवा पिढीने उत्स्फूर्तपणे सहभागी व्हावे, असे आवाहनही मुख्यमंत्र्यांनी केले आहे.

या ऐतिहासिक जलसंधारण मोहिमेत सहभागी होण्यासाठी राज्य शासनाच्या जाहिराती तसेच समाजमाध्यमांवर उपलब्ध असलेला अधिकृत क्यूआर कोड स्कॅन करून नागरिकांनी आपला सहभाग नोंदवावा, असे श्री. फडणवीस यांनी सांगितले.

जलसंधारण ही केवळ राज्य शासनाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचा सहभाग आवश्यक असलेली लोकचळवळ आहे. त्यामुळे या जनजागृती अभियानात प्रत्येकाने सहभागी होऊन जलसंधारणाचा संदेश घराघरात पोहोचवावा, असे आवाहन मुख्यमंत्री फडणवीस यांनी केले आहे.

"चला, एकत्र येऊया, जलदूत बनून पाण्यासाठी चालूया.' "पाणी अडवा, पाणी जिरवा या मूलमंत्राला जगवूया,' असे आवाहन मुख्यमंत्र्यांनी केले आहे.

## सरपंचांवर दबाव आणण्यासाठी खोट्या तक्रारी;निष्पक्ष चौकशीची मागणी

**गोंदिया:**ग्रामपंचायतीचे सार्वजनिक प्रश्न आणि विविध स्थानिक विषयांवरून निर्माण झालेल्या वैमनस्यातून सरपंचांना मानसिक त्रास देणे, खोट्या तक्रारी दाखल करून दबाव निर्माण करणे आणि मारहाणीचा प्रकार घडल्याचा गंभीर आरोप तालुक्यातील लोधीटोला येथे समोर आला आहे. या प्रकरणी सरपंचांच्या मुलीसह गावातील नागरीकांनी आज शहर पोलीस ठाण्याचे पो.निरीक्षक यांची भेट घेऊन निष्पक्ष चौकशीची मागणी करत निवेदन सादर केले आहे.

दिलेल्या निवेदनानुसार , त्यांचे वडील गावामध्ये ग्रामपंचायतीचे सरपंच म्हणून कार्यरत आहेत. गावातील विविध विकासकामे आणि सार्वजनिक प्रश्नांवरून काही स्थानिक व्यक्तींशी त्यांचे मतभेद झाले होते. या वैमनस्यातूनच त्यांच्या वडिलांविरुद्ध वारंवार खोट्या आणि वस्तुस्थितीविरुद्ध तक्रारी करून त्यांच्यावर मानसिक दबाव आणण्याचा व त्यांची सामाजिक प्रतिमा मलिन करण्याचा प्रयत्न केला जात आहे.

अलिकडेच घडलेल्या एका मारहाणीच्या घटनेचा उल्लेख करत निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे की, या प्रकरणातील खरी वस्तुस्थिती निष्पक्ष तपासातूनच समोर येणे गरजेचे आहे. घटना नेमकी कशी घडली, वाद कुणी उकरून काढला आणि त्यावेळी कोण उपस्थित होते, याचा सत्य शोधणे आवश्यक आहे. या तपासात कुठलाही अडथळा येऊ नये किंवा पुरावे नष्ट केले जाऊ नयेत, यासाठी घटनास्थळ आणि परिसरातील CCTV, DVRव NVR फुटेज तात्काळ पोलिसांनी सुरक्षित ताब्यात घ्यावे, अशी प्रमुख मागणी करण्यात आली आहे.

विशेष म्हणजे, पोलीस निरीक्षक शहर पोलीस कार्यालयात हे निवेदन सादर करताना लोधीटोला गावातील मोठ्या संख्येने महिला व पुरुष नागरिक उपस्थित होते. यावरून या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात येत असून, उपलब्ध वैद्यकीय अहवाल, फोटो, व्हिडिओ आणि प्रत्यक्षदर्शींचे जबाब नोंदवून कायद्यानुसार योग्य ती निष्पक्ष कारवाई करण्यात यावी, अशी आशा ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.

## पळू नका, हत्तीपाय रोग व अंडवृद्धी रुग्ण शोध मोहिमेस सहकार्य करा...- जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.अभिजीत गोल्हार

### जिल्ह्यात १६ ते ३१ ऑगस्ट दरम्यान हत्तीरोग शोध मोहिमेत आरोग्य कर्मचाऱ्यांना खरी माहिती द्या

**गोंदिया:-** हत्तीरोग (लिम्फटिक फायलेरियासिस) हा डासांपासून मनुष्याला होणारा रोग आहे. या मध्ये रुग्णांचे पाय (अवयव) ?वृषण हे आकाराने जाड होतात व रुग्णास हालचाल करणेही अवघड होवून बसते.हत्तीरोग हा शरीर विद्रूप करून अकार्यक्षम करणारा रोग असल्याने जिल्ह्यात दि.१६ ते ३१ ऑगस्ट दरम्यान हत्तीरोग शोध मोहीमेत आरोग्य कर्मचार्यांना खरी माहिती देण्याचे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.अभिजीत गोल्हार यांनी केले आहे. मोहिमे दरम्यान आरोग्य कर्मचारी गृहभेटी दरम्यान नवीन हत्तीरोग रुग्णांची माहिती नोंदविणार व जुन्या रुग्णांना आरोग्य शिक्षण देणार आहेत.



हत्तीरोग हा बुचेरेरिया बँक्रोफ्टी आणि ब्रुजीया मलायी नावाच्या परजीवी जंतुमुळे होणारा आणि डासामुळे प्रसारित होणारा रोग.ह्या रोगाचा प्रसार क्युलेक्स जातीच्या डासदंशामुळे होतो.हा रोग झाल्यानंतर त्यावर कोणताही परिणामकारक उपाय नाही. हत्तीरोग होऊ नये, यासाठी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून सामुदायिक औषधोपचार मोहिमे दरम्यान आरोग्य कर्मचारी मार्फत दिली जाणारी वयोमानानुसार डीईसी गोळ्यांची मात्रा एकदाच सेवन करणे आव?यक असल्याचे जिल्हा हिवताप अधिकारी डॉ.विनोद चव्हाण यांनी माहीती दिली आहे.

**लक्षणे-** थंडी वाजून येणे, ताप येणे, पाय दुखून येणे, वृषण आकाराने जाड होणे.

मनुष्याचे दोन्ही पाय हत्तीच्या पायांसारखे जाड व मोठे होतात आणि हालचाल करण्यास अवघड होणे.

**हत्तीरोग जंतूचे जीवन चक्र-**

✻ हत्तीरोगाच्या जंतूचा आकार बारीक धाग्यासमान कृमीसारखा असतो. हे जंतू प्रामुख्याने लसिका ग्रंथीमध्ये सापडतात. पूर्ण वाढ झालेल्या परजीवी जंतूचे आयुष्य पाच ते दहा वर्षे असते.

✻ नर-मादीच्या संबंधानंतर मादी कृमी फार मोठ्या प्रमाणावर गर्भांना जन्म देते. त्यांना मायक्रोफायलेरिया असे म्हणतात.

✻ हे मायक्रोफायलेरिया हत्तीरोगाचा संसर्ग झालेल्या माणसाच्या रक्तात विशेषत: रात्रीच्या वेळी मुबलक प्रमाणात आढळतात.

✻ अशा रुग्णाला रात्रीच्यावेळी क्युलेक्स डास चावल्यास रक्त शोषणासोबत जंतू डासांच्या शरीरात प्रवेश करतात. डासाच्या जठरात मायक्रोफायलेरिया पोहोचल्यावर त्यांच्यावरील बाह्य आवरण गळून पडते.

✻ ते डासाच्या जठराला भेदून डासांच्या छाती अथवा धडाच्या स्नायूत शिरतात. तिथे त्यांची वाढ व विकास होऊन ते संसर्गक्षम बनतात.

✻ डासांमधील मायक्रोफायलेरियाच्या विकास चक्रास सर्वसाधारणतः १० ते १४ दिवस लागतात. त्यानंतर सूक्ष्मअळीत रूपांतरित झालेले संसर्गक्षम मायक्रोफायलेरिया डासांच्या सोंडेत जातात.

✻ असा डास माणसाला चावला की, त्या संसर्गक्षम सूक्ष्म अळ्यांचा माणसाच्या शरीरात प्रवेश होतो.

✻ माणसाच्या शरीरात प्रवेश होताच त्या सूक्ष्म अळ्या लसिका वाहिन्यात प्रवेश करतात आणि तिथेच साधारणत: वर्षभरात परिपक्व होतात.

**संसर्ग स्त्रोत-** रक्तात मायक्रोफायलेरिया असतात अशा व्यक्ती एकदा हत्तीरोग पूर्ण विकसित झाला की नंतर मात्र त्या रुग्णाच्या रक्तामध्ये जंतू सापडणे कठीण असते.

**प्रसार पद्धत-**संसर्गक्षम सूक्ष्म अळ्या सोंडेमध्ये असलेला डास चावला की रोगाचा प्रसार होतो. दोन प्रकारच्या डासांमुळे हत्तीरोगाचा प्रसार होतो. १) क्युलेक्स फटिगन्स- बॅक्रॉफ्टीयन हत्तीरोग २) मान्सानॉईडीस- मलायन हत्तीरोग

**अधिशियन काळ-** पाच ते दहा महिने. हत्तीपाय आजाराचे जंतुनी शरीरात प्रवेश केल्यानंतर आजाराची लक्षणे निर्माण होण्यास पाच ते दहा महिने लागतात.

हत्तीरोग, हत्तीपाय आजार चिन्हे-या रोगातील प्रमुख लक्षणे म्हणजे वारंवार येणारा ताप आणि जननेंद्रिये, पाय, हात यावर बेढब व अवाजवी सूज येते. हा रोग प्राणघातक नसला तरीही त्याच्यामुळे व्यंग निर्माण होऊन शारीरिक कार्यक्षमता कमी होते.

**हत्तीरोग आजाराची चार अवस्था-**

१) लक्षणविरहित जंतू शिरकावची अवस्था- हत्तीरोगग्रस्त भागात राहत असूनही लोकांच्या रक्तात रोगजंतूच्या सूक्ष्म अळ्या किंवा लक्षणे दिसत नाहीत.

२) चिन्हे- लक्षण विरहित जंतू संसर्ग अवस्था- रक्ताच्या तपासणीत रोगजंतूच्या सूक्ष्म अळ्या दिसतात मात्र रोगाचे कोणतीही लक्षणे व चिन्हे दिसत नाहीत.

३) तीव्र लक्षण अवस्था- या अवस्थेमध्ये ताप, लसिकाग्रंथी दाह, लसिकाग्रंथीस सूज, पुरुषांमध्ये वृषणदाह इत्यादी लक्षणे दिसून येतात.

४) दीर्घकालीन संसर्गावस्था- हात, पायावर सूज, बाह्य जनेंद्रियावर सूज, हायड्रोसिल.

## वैभव परतलं! स्वातंत्र्यदिनी नवेगावबांधवर २५ हजार पर्यटकांची धडक; सुविधांचा फज्जा, सरकार लक्ष देणार का?



**गोंदिया:-**एकेकाळी विदर्भाचे नंदनवन मानले जाणारे गोंदिया जिल्ह्यातील ऐतिहासिक ङ्गनवेगावबांध पर्यटन संकूलफ पुन्हा एकदा आपल्या पूर्ण वैभवाने नटले आहे. लालफितशाही आणि लोकप्रतिनिधींच्या अनास्थेमुळे काही काळ दुर्लक्षित राहिलेल्या या पर्यटन स्थळाला स्थानिक तरुण आणि जागरूक नागरिकांच्या प्रयत्नांमुळे पुन्हा सोन्याचे दिवस आले आहेत. १५ ऑगस्टच्या स्वातंत्र्यदिनी तब्बल २५ हजारांहून अधिक पर्यटकांनी येथे हजेरी लावत या निसर्गरम्य परिसराचा आनंद लुटला. मात्र, या प्रचंड गर्दीमुळे येथील अपुऱ्या सोयी-सुविधांचे पितळ उघडे पडले असून आता तरी जिल्हा प्रशासन व राज्य सरकार याकडे गांभीर्याने लक्ष देणार का, असा रोखठोक सवाल उपस्थित केला जात आहे.

### जिल्हाधिकारी दखल घेणार का?

**स्वातंत्र्यदिनी उसळलेली ही प्रचंड गर्दी म्हणजे जिल्हा प्रशासनासाठी पर्यटन विकासाचा स्पष्ट संकेत आहे. आता जिल्हाधिकारी तथा जिल्हा पर्यटन समितीच्या अध्यक्षांनी वाढत्या प्रतिसादाची दखल घेऊन पायाभूत सुविधांचा विस्तार करावा, तसेच वनविभागाच्या प्रस्तावाबाबत स्थानिकांच्या मागण्यांवर तातडीने निर्णय घ्यावा, अशी जोरदार मागणी होत आहे.**

१९७१ मध्ये स्थापन झालेल्या या राष्ट्रीय उद्यानात पक्ष्यांची विविधता, वन्यजीवांचा अधिवास आणि निसर्गरम्य तलाव पर्यटकांसाठी मुख्य आकर्षण ठरले होते. परंतु, २००० च्या दशकात प्रशासकीय दुर्लक्षामुळे हे केंद्र ओसाड पडले होते. पर्यटकांनी पाठ फिरवल्यानंतर मनवेगावबांध फाउंडेशनफच्या तरुणांनी पुढाकार घेतला. श्रमदान, स्वखर्च आणि प्रशासनाकडे सातत्यपूर्ण पाठपुरावा करून त्यांनी उद्यानाचा कायापालट केला. यात आमदार राजकुमार बडोले, खासदार प्रफुल पटेल यांच्यासह लोकप्रतिनिधींनीही निधी उपलब्ध करून दिल्याने या स्थळाला गतवैभव प्राप्त झाले आहे.

**पर्यटनातून रोजगाराची संधी, पण सुविधांचे काय?**

सध्या या पर्यटन स्थळामुळे परिसरातील ५०० हून अधिक स्थानिकांना थेट रोजगार मिळत आहे. शनिवार, रविवार आणि सुट्टीच्या दिवशी येथे पर्यटकांचा जनसागर उसळतो. १५ ऑगस्ट रोजी २५ हजार पर्यटकांची एकदम झालेली गर्दी व्यवस्थापनाच्या अंगाशी आली. पार्किंग, स्वच्छतागृहे आणि मूलभूत पायाभूत सुविधांच्या अभावामुळे पर्यटकांची मोठी तारांबळ उडाली. निसर्गाचे वरदान लाभलेल्या या क्षेत्राचा विस्तार केल्यास रोजगाराच्या हजारो नवीन संधी निर्माण होऊ शकतात, अशी भावना पर्यटकांनी व्यक्त केली.



**"रसातळाला गेलेल्या या पर्यटन स्थळाला स्थानिक युवकांच्या साथीने पुन्हा गतवैभव मिळवून दिले आहे. या क्षेत्राच्या विकासासाठी मोठा निधी उपलब्ध करून दिला असून, आगामी काळात येथे मनवेगावबांध पर्यटन महोत्सवफआयोजित करण्यासाठी शासनाकडे पाठपुरावा करणार आहे."**

**राजकुमार बडोले, आमदार**

**"नवेगावबांध पर्यटन स्थळाचे महत्त्व दिवसेंदिवस वाढत आहे. या स्थळाचा एक स्वतंत्र विकास आराखडा शासनाकडे सादर केल्यास आणि बीओटी (इजढ) तत्त्वावर नियोजनबद्ध विकास केल्यास या संपूर्ण परिसराचा कायापालट होईल."**

**रामदास बोरकर, सचिव, नवेगावबांध फाउंडेशन**

## गोंदिया जिल्हा परिषदेत स्वातंत्र्यदिनी 'अवयवदान'चा जागर; अधिकारी-कर्मचाऱ्यांनी घेतली शपथ

**गोंदिया :-**देशाच्या ८० व्या स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून गोंदिया जिल्हा परिषदेत शनिवारी (१५ ऑगस्ट) अवयवदानाविषयी जनजागृती करत एक अनोखा आदर्श प्रस्थापित करण्यात आला. झेंडावंदनानंतर जिल्हा परिषदेचे पदाधिकारी, अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी 'अवयवदान हेच महादान' या संकल्पनेवर आधारित शपथ घेत समाजाला एक सकारात्मक संदेश दिला आहे.



राज्यात ३ ते १५ ऑगस्ट या कालावधीत मअवयवदान महादानफ अभियान एक चळवळ म्हणून राबविण्याचे निर्देश सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिले होते. याला उत्तम प्रतिसाद देत मुख्य कार्यकारी अधिकारी झेनिथ दोंतुला यांच्या विशेष पुढाकारातून गोंदिया जिल्हा परिषदेत हा जनजागृती उपक्रम राबविण्यात आला. जिल्हा परिषद अध्यक्ष लायकरामजी भेंडारकर यांच्या हस्ते मुख्य कार्यालयात ध्वजारोहण पार पडले. त्यानंतर सामान्य प्रशासन विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी फरेंद्र कुतिरकर यांनी उपस्थित सर्व अधिकारी व कर्मचारीवर्गाला अवयवदानाची शपथ दिली.

याप्रसंगी जि.प. उपाध्यक्ष सुरेश हर्षे, वित्त व बांधकाम सभापती डॉ. लक्ष्मण भगत, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. तानाजी लोखंडे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी जनार्दन खोटरे, महिला बाल विकास उपमुख्य कार्यकारी अधिकारी कटरे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभिजीत गोल्हार यांच्यासह सर्व खातेप्रमुख, अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### २१ ऑगस्टला महा वॉकेथॉन मध्ये सर्वांनी सहभागी व्हावे- जिल्हाधिकारी

**गोंदिया :** महाराष्ट्र शासनाने स्व. सुधाकरराव नाईक यांच्या जयंती निमित्त दि.१५ ऑगस्ट ते २१ ऑगस्ट २०२६ हा जलसंधारण सप्ताह म्हणून साजरा करण्याचे ठरविले आहे. यामध्ये २१ ऑगस्ट रोजी महा वॉकेथॉन-वॉक फॉर वॉटर ही संकल्पना आयोजित केलेली आहे.गोंदिया जिल्हा हा जलसंधारणाच्या दृष्टीकोनातून अत्यंत महत्वाचा जिल्हा आहे. या सप्ताहामध्ये दि.२१ ऑगस्ट रोजी महा वॉकेथॉन उपक्रम संपूर्ण जिल्हाभर आयोजित करण्यात येत आहे. या उपक्रमात जिल्ह्यातील सर्व युवकांनी सहभागी होण्याचे आवाहन जिल्हाधिकारी मंदार पत्की यांनी केले आहे.

## आदिवासी विद्यार्थ्यांचे देवरी प्रकल्प कार्यालयासमोर बेमुदत आंदोलन

**देवरी-**गडचिरोली जिल्ह्यातील जतपलाई येथील आदिवासी आश्रमशाळेतील सर्पदंशाच्या घटनेच्या पार्श्वभूमीवर तसेच आदिवासी विकास विभागाने ५ ऑगस्ट २०२६ रोजी काढलेल्या शासन निर्णयाच्या निषेधार्थ आदिवासी विद्यार्थी आक्रमक झाले आहेत. महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांमध्ये आंदोलन सुरू असतानाच देवरी येथील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयासमोर विद्यार्थ्यांनी दिनांक १७ ऑगस्ट २०२६ पासून बेमुदत आंदोलन सुरू केले आहे.

शासन निर्णय रद्द होईपर्यंत आंदोलन सुरूच ठेवण्याचा निर्धार आंदोलक विद्यार्थ्यांनी व्यक्त केला असून, आदिवासी विकास मंत्र्यांनी पदाचा राजीनामा द्यावा, अशी मागणीही करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांच्या प्रमुख मागण्यांमध्ये वसतिगृह प्रवेशासाठीची २६ वर्षांची वयोमर्यादा पूर्णपणे रद्द करणे, तालुकास्तरीय वसतिगृहासाठी अंतराची कोणतीही अट न ठेवणे, तर जिल्हा व विभागीय स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी पाच किलोमीटर अंतराची अट लागू करणे, यांचा समावेश आहे.

गेल्या दोन वर्षांपासून प्रलंबित असलेली शिष्यवृत्ती तातडीने वितरित करावी, तसेच जिल्हा व विभागीय स्तरावरील वसतिगृहांमध्ये लागू असलेली उढ्ढ योजना बंद करून पूर्वीप्रमाणे खानपान योजना सुरू करावी, अशी मागणी विद्यार्थ्यांनी केली आहे.

वसतिगृहातील सांस्कृतिक कार्यक्रम व स्नेहसंमेलनासाठीचा वार्षिक निधी १५ हजारांवरून २५ हजार रुपये, तर क्रीडा साहित्याचा निधी १० हजारांवरून १५ हजार रुपये करावा. तसेच आदिवासी विद्यार्थ्यांसाठी नवीन वसतिगृह इमारती उपलब्ध करून द्याव्यात, अशीही मागणी करण्यात आली आहे.

दरम्यान, आश्रमशाळा व वसतिगृहातील विद्यार्थ्यांना विमा संरक्षण देण्यासह त्यांच्या सुरक्षेसाठी ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणीही आंदोलनातून पुढे आली आहे.

## हाजराफॉल परिसरात श्रमदानातून राबवली स्वच्छता मोहीम

**सालेकसा :-** गोंदिया जिल्ह्यातील प्रमुख पर्यटन स्थळ ओळखल्या जाणाऱ्या सालेकसा तालुक्यातील प्रसिद्ध धबधबा हाजराफॉल या पर्यटनस्थळाला १६ ऑगस्ट रोजी गोंदिया शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा वर्षा प्रफुल्ल पटेल यांनी भेट देऊन आपल्या सहकाऱ्यांना घेऊन स्वच्छता मोहीम राबवली.



हाजराफॉल परिसरात संयुक्त वन व्यवस्थापन समिती, नवाटोला व वनविभागाद्वारे विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. याबाबतची सविस्तर माहिती यावेळी वर्षा पटेल यांना दिली. ॲडव्हेंचर गेम्स, लहान बालकांना खेळण्यासाठी विविध उपक्रमांबाबत वर्षा पटेल यांनी कौतुक केले. तसेच त्यांनी हाजराफॉल येथे स्वच्छतेचा संदेश देत उपस्थित लोकांना स्वच्छता आणि नैसर्गिक सौंदर्य टिकवण्यात यावे यासाठी स्वतः प्लास्टिक कचरा गोळा करीत स्वच्छतेचे महत्व पटवून दिले.

याप्रसंगी त्यांनी उपस्थित पर्यटक, दुकानदारांशी आपुलकीने संवाद साधला. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे शहर अध्यक्ष ब्रजभूषण बैस, संयुक्त वन व्यवस्थापन समिती, नवाटोलाचे अध्यक्ष गोविंद मरसकोल्हे, वनविभाग, सालेकसाचे वना परिक्षेत्र अधिकारी जे.जी. खान, वनरक्षक जी.एस. पाऊलझगडे, वनरक्षक विनोद भांडारकर, वनरक्षक ए.एन. बारसे ग्रामपंचायत सदस्य व समितीचे कर्मचारी ममता कोडवती, तालुका राष्ट्रवादी काँग्रेस युवती अध्यक्ष सुषमा राऊत, तालुका युवा उपाध्यक्ष ध्रुवकुमार हुकरे, संदीप राऊत, प्रियंका ब्राह्मणकर अंकुश सूर्यवंशी, अमित वैध उपस्थित होते.

## धावत्या दुरांतो एक्सप्रेसमध्ये प्रसूती करणाऱ्या "आरोग्य देवदूत' राजश्री भोंडेंचा स्वातंत्र्यदिनी विशेष सन्मान

**गोंदिया:-**धावत्या ट्रेनमध्ये निर्माण झालेली अत्यंत गंभीर परिस्थिती, वैद्यकीय साधनांची कमतरता आणि पुढील स्थानक येण्यासाठी असलेला मोठा वेळ... अशा कठीण प्रसंगी दाखवलेले असामान्य धैर्य अनब समयसूचकतेच्या बळावर एका गरोदर महिलेची सुरक्षित प्रसूती करणाऱ्या गोंदियातील आरोग्य सेविका राजश्री भोंडे (नेवारे) यांचा १५ ऑगस्ट रोजी स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून विशेष नागरी सत्कार करण्यात आला.

८० व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त कारंजा येथील पोलीस मुख्यालयाच्या मैदानावर आयोजित मुख्य ध्वजारोहण सोहळ्यात गोंदियाचे पालकमंत्री इंद्रनील नाईक यांच्या हस्ते राजश्री भोंडे यांना सन्मानपत्र व पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले.

काय घडली होती घटना?

२४ जून २०२६ रोजी नागपूरहून मुंबईकडे जाणाऱ्या दुरांतो सुपरफास्ट एक्सप्रेसमध्ये ही थरारक घटना घडली होती. ट्रेन जळगाव स्थानक ओलांडून पुढे जात असताना एका गरोदर महिला प्रवाशाला अचानक तीव्र प्रसूती कळा सुरू झाल्या. पुढील स्टेशन गाठण्यासाठी बराच वेळ असल्याने ट्रेनमधील प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण पसरले.

त्याच ट्रेनमधून प्रवास करत असलेल्या प्राथमिक आरोग्य केंद्र काटी (उपकेंद्र मरारटोला) येथील आरोग्य सेविका राजश्री भोंडे यांनी परिस्थितीचे गांभीर्य ओळखून तात्काळ पुढाकार घेतला. पुरेशी वैद्यकीय साधने उपलब्ध नसतानाही स्वतःचा अनुभव आणि कौशल्याच्या जोरावर त्यांनी धावत्या ट्रेनमध्येच महिलेची सुखरूप प्रसूती केली.



चाळीसगाव येथे तात्काळ वैद्यकीय मदत

प्रसूतीनंतर राजश्री भोंडे यांच्या सूचनेनुसार रेल्वे प्रशासनाशी तात्काळ संपर्क साधण्यात आला. ट्रेन चाळीसगाव रेल्वे स्थानकावर पोहोचताच आधीच सज्ज असलेल्या १०८ रुग्णवाहिकेद्वारे माता व नवजात बाळाला पुढील उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले.

आरोग्य विभागाच्या वतीने जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभिजित गोल्हार यांनी पाठवलेल्या प्रस्तावाची दखल घेत जिल्हाधिकारी मंदार पत्की व निवासी उपजिल्हाधिकारी भय्यासाहेब बेहरे यांनी या कौतुकास्पद कामगिरीची दखल घेत स्वातंत्र्यदिनी या सत्काराचे आयोजन केले.

या सोहळ्यास जिल्हाधिकारी मंदार पत्की, मुख्य कार्यकारी अधिकारी झेनीत दोन्तुला, अप्पर पोलीस अधीक्षक अभय डोंगरे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभिजित गोल्हार यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. राजश्री भोंडे यांनी दाखवलेल्या या समयसूचकतेचे संपूर्ण आरोग्य वर्गातून आणि जिल्ह्यातून जोरदार कौतुक होत आहे.

## संपादकीय

### आरक्षणाचे तुकडे करून सामाजिक न्याय साधणार का?

अनुसूचित जातींचे आरक्षण हा कोणत्याही एका जातीला दिलेला मउपकारफ नाही. उपकार हा शब्द यासाठी वापरा, की आजकाल काहीं उच्चवर्णीय असलेल्या मात्र वैचारिक दारिद्र्याने ग्रासलेल्या तथाकथितांकडून आरक्षणाकडे याच शब्दांच्या चष्मातून बघितले जाते आणि समाजात देखील ते आरक्षणाला याच शब्दातून प्रेजेंट करण्याचा प्रयत्न करतात. असो, आरक्षण म्हणजे भारतीय संविधानाने शतकानुशतके चालत आलेल्या जातीय अत्याचार, अस्पृश्यता आणि सामाजिक बहिष्काराविरुद्ध दिलेला घटनात्मक न्यायाचा हक्क आहे. त्यामुळे अनुसूचित जातींच्या आरक्षणाचे उपवर्गीकरण हा केवळ प्रशासकीय निर्णय नसून, सामाजिक न्यायाच्या मूळ संकल्पनेलाच आव्हान देणारा प्रश्न आहे.

२०११ च्या जनगणनेनुसार देशातील अनुसूचित जातींची लोकसंख्या सुमारे २०.१४ कोटी, म्हणजे देशाच्या एकूण लोकसंख्येच्या १६.६३ टक्के होती. त्यांचा साक्षरता दर ६६.०७ टक्के होता, तर देशाचा सरासरी साक्षरता दर ७२.९८ टक्के होता. ही आकडेवारी एक गोष्ट स्पष्ट करते– आरक्षण असूनही अनुसूचित जातींच्या मोठ्या वर्गाची सामाजिक आणि शैक्षणिक स्थिती अजूनही असमान आहे. केंद्र सरकार आणि राज्य सरकारांच्या सेवांमध्ये आरक्षणाची तरतूद असताना, मूळ प्रश्न असा आहे की उपलब्ध संधीच मुळात अपुऱ्या असताना त्याच आरक्षणाचे तुकडे करून मुख्य समस्या सुटणार आहे का?

१ ऑगस्ट २०२४ रोजी सर्वोच्च न्यायालयाच्या सात न्यायाधीशांच्या घटनापीठाने 'पंजाब विरुद्ध देविंदर सिंह' प्रकरणात ६:१ अशा बहुमताने अनुसूचित जातींमध्ये उपवर्गीकरण करण्याचा राज्य सरकारांचा मार्ग खुला केला. न्यायालयाने यापूर्वीच्या २००४ मधील मई. व्ही. चेन्नय्याफ निर्णयातील भूमिका बदलली. मात्र या निर्णयाचा अर्थ असा अजिबात नाही की प्रत्येक राज्याने अनुसूचित जातीच्या आरक्षणाचे तातडीने जातीनिहाय तुकडे करावेत.

सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे की उपवर्गीकरण मनमानी पद्धतीने करता येणार नाही. त्यासाठी संबंधित घटकांच्या अपुऱ्या प्रतिनिधित्वाचे समर्थन करणारी परिमाणात्मक आणि अनुभवाधारित आकडेवारी आवश्यक आहे. म्हणजेच केवळ राजकीय घोषणा, जातीय दबाव किंवा लोकसंख्येचे गणित पुरेसे नाही, असा त्याचा थेट अर्थ आहे.

याच ठिकाणी सर्वात गंभीर प्रश्न उभा राहतो–आपल्याकडे अशी अद्ययावत, पारदर्शक आणि शास्त्रीय जातनिहाय आकडेवारी उपलब्ध आहे का? उपवर्गीकरणाचे समर्थक म्हणतात की अनुसूचित जातींमधील काही विशिष्ट जातींना आरक्षणाचा अधिक लाभ मिळाला आणि काही जाती मागे राहिल्या. हा प्रश्न दुर्लक्षित करता येणार नाही. परंतु त्यावरील उपाय काय?

सरकारने शैक्षणिक सुविधा वाढवाव्यात, वसतिगृहे उभारावीत, शिष्यवृत्तीची रक्कम वेळेवर व वाढवून द्यावी, कौशल्यविकास कार्यक्रम राबवावेत, विशेष भरती मोहिमा राबवाव्यात आणि ज्या घटकांचे प्रतिनिधित्व कमी आहे त्यांच्यासाठी विशेष सवलती द्याव्यात. पण उपलब्ध आरक्षणाच्या ताटातील अन्न पुरेसे नसताना तो सर्वांना कसा पुरणार? हा सामाजिक न्यायाचा विस्तार कसा ठरू शकतो?

एकूण आरक्षणाच्या जागा वाढत नसतील, सरकारी नोकऱ्यांची संख्या घटत असेल आणि उच्च शिक्षणातील स्पर्धा तीव्र होत असेल, तर उपवर्गीकरणामुळे एका घटकाला मिळणाऱ्या संधींच्या बदल्यात दुसऱ्या घटकाच्या संधी कमी होणार हे उघड आहे. ही स्पर्धा वंचितांमध्येच निर्माण करणे कोणाच्या हिताचे आहे?

अनुसूचित जातींमध्ये सामाजिक आणि आर्थिक विषमता असू शकते; पण त्यावर उपाय म्हणून प्रत्येक घटकाला वेगळ्या आरक्षणाच्या चौकटीत ढकलण्याची प्रवृत्ती वाढली, तर उद्या कोणता घटक किती टक्के मागास आहे, कोणाला किती वाटा मिळाला यावर अंतहीन अंतर्गत संघर्ष सुरू होईल. आरक्षण हा सामाजिक न्यायाचा आणि समतेचा पूल असायला हवा; वंचित समाजघटकांमध्ये संघर्ष निर्माण करणारी भिंत नव्हे.आज उपवर्गीकरणाच्या नावाखाली एका घटकाला स्वतंत्र वाटा देण्याची मागणी होत असेल, तर उद्या दुसरा घटक त्याहून मोठ्या वाट्याची मागणी करेल. अशा प्रकारे आरक्षणाचे राजकारण सामाजिक न्यायापेक्षा 'जातीय संख्याशास्त्राचे राजकारण' बनण्याचा मोठा धोका आहे.

खरी गरज आरक्षणाचे तुकडे नव्हे, तर संधींचा विस्तार करण्याची आहे. अनुसूचित जातींमधील मागासलेपणा दूर करायचा असेल तर सरकारने "कोणाला किती आरक्षण?" या प्रश्नापेक्षा "सर्वांना पुढे जाण्यासाठी किती संधी उपलब्ध आहेत?" हा प्रश्न विचारला पाहिजे. सरकारी शाळा आणि महाविद्यालयांची गुणवत्ता सुधारणे, उच्च शिक्षण, वसतिगृहे आणि शिष्यवृत्तीचा विस्तार करणे, स्पर्धा परीक्षांचे मोफत प्रशिक्षण व रोजगारनिर्मितीवर भर देणे, शासकीय सेवांमधील बॅकलॉग तत्काळ भरणे आवश्यक आहे.

आरक्षणाच्या जागा भरल्या जात नसतील तर त्या प्राधान्याने भरा. शिक्षणाची दारे बंद असतील तर ती उघडा. रोजगाराच्या संधी कमी असतील तर त्या वाढवा. पण आरक्षणाच्या मर्यादित संधींसाठी वंचित समाजघटकांना एकमेकांविरुद्ध उभे करू नका.

सर्वोच्च न्यायालयाने उपवर्गीकरणाला घटनात्मक "शक्यता" दिली आहे; ती राज्य सरकारांवर लादलेली मसामाजिक बंधनकारकताफ नाही. त्यामुळे राज्यकर्त्यांनी न्यायालयाच्या निर्णयाचा राजकीय लाभ घेण्याऐवजी त्यातील घटनात्मक अटी समजून घेतल्या पाहिजेत.सामाजिक न्याय म्हणजे एका वंचिताच्या हातातून हक्क काढून दुसऱ्या वंचिताच्या हातात देणे नव्हे, तर ज्याला अजून संधी मिळाली नाही त्याच्यासाठी नवीन संधींचे दालन उघडणे होय. आरक्षणाचे तुकडे करून नव्हे, तर संधींचा विस्तार करूनच समतेचा आणि बंधुत्वाचा मार्ग खुला होईल!

# महा वॉकेथॉन २०२६-वॉक फॉर वॉटर

## २१ ऑगस्ट जलसंधारण दिनी राज्यभर आयोजन

शाश्वत विकासासाठी मृदसंधारण व जलसंधारणाबाबत २१ ऑगस्ट २०२६ रोजी राज्यातील सर्व जिल्ह्यात "महा वॉकेथॉन–वॉक फॉर वॉटर" (Maha Walkathon-Walk for Water) या उपक्रमाचे असून मृद व जलसंधारण विभागाच्यावतीने आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमाची थीम सेव सॉईल, सेव वॉटर, सेक्युअर टूमारो ( Save Soil, Save Water, Secure Tomorrow) अशी असून पाणी अडवा, पाणी जिरवा, जलयुक्त महाराष्ट्र घडवा हे घोषवाक्य आहे. राज्यातील सर्व जिल्ह्यात २१ ऑगस्ट रोजी कमाल ३ किलोमीटर (महा वॉकेथॉन) चालणे आणि मृद व जलसंधारणाची शपथ घेणे असे या कार्यक्रमाचे स्वरुप आहे.

शाश्वत विकासासाठी मृदसंधारण व जलसंधारण हे आवश्यक असून त्याचे महत्त्व पटवून देण्याकरिता राज्यात १५ ते २१ ऑगस्ट, २०२६ दरम्यान "जलसंधारण सप्ताह' आणि १५ ऑगस्ट, २०२६ ते २६ जानेवारी, २०२७ दरम्यान "जलसंधारण अभियान' आयोजित करण्यात येत आहे. तर २१ ऑगस्ट २०२६ रोजी राज्यातील सर्व जिल्ह्यात शाश्वत विकासासाठी मृदसंधारण व जलसंधारणाबाबत "महा वॉकेथॉन–वॉक फॉर वॉटर' (Maha Walkathon-Walk for Water) या उपक्रमाचे आयोजन करुन जलसंवर्धनाला लोकचळवळीचे स्वरुप देण्याचे कार्य राज्य शासनाने हाती घेतले असून मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी या लोकचळवळीत राज्यातील सर्व नागरिकांनी सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.

राज्यस्तरीय कार्यक्रम मुंबई येथे होणार असून प्रत्येक जिल्ह्यात कार्यक्रमाच्या आयोजनाचे प्रमुख जिल्हास्तरीय मृद व जलसंधारण समितीचे अध्यक्ष म्हणून जिल्हाधिकारी हे असणार आ-




हेत. या कार्यक्रमासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, सर्व मंत्री, सर्व राज्यमंत्री, राज्यसभा/ लोकसभा/ विधानपरिषद/ विधानसभा सदस्य, सर्व जिल्हापरिषद अध्यक्ष/उपाध्यक्ष, सर्व महापौर / उपमहापौर, सर्व नगराध्यक्ष/उपनगराध्यक्ष, सर्व जिल्हापरिषद / पंचायत समिती / ग्रामपंचायत सदस्य, सर्व महानगरपालिका/नगरपालिका/ नगरपंचायत सदस्य आणि इतर स्थानिक लोकप्रतिनिधी यांना निमंत्रित करण्यात येणार आहे.

सर्व प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी, सर्व निमशासकीय अधिकारी व कर्मचारी, जिल्ह्यातील नामांकित व प्रतिष्ठित व्यक्ती / डॉक्टर / कलाकार/ उद्योजक, जिल्ह्यातील राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळाडू, जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयीन व शालेय विद्यार्थी, एनसीसी, एनएसएस, माय भारत, नेहरु युवा केंद्र, भारत स्काऊट्स अँड गाईड्स, रेड क्रॉस, होमगार्ड, स्वयंसेवी संस्था, रोटरी क्लब सदस्य, लायन्स क्लब सदस्य, रनिंग क्लब सदस्य, सायकलिंग क्लब सदस्य, उद्योग व व्यापारी संघटना, सीएसआर भागीदार कंपन्या, विविध क्रीडा संघटना, गुड मॉर्निंग ग्रुप्स, विविध व्यायाम शाळा, स्वयंसेवी संस्था, महिला, राज्याचे नागरिक यांना सहभागी करण्यात येणार आहे.

### क्यूआर आधारित ऑनलाईन नोंदणी

महा वॉकेथॉन मध्ये सहभागी होण्यासाठी क्यूआर आधारित ऑनलाईन नोंदणी करता येणार आहे. २१ ऑगस्ट रोजी महा वॉकेथॉन मध्ये सहभागी प्रत्येक व्यक्तीस ई–प्रमाणपत्र मिळणार आहे. तर प्रथम दहा विजेत्यास जिल्हास्तरावर सन्मानचिन्ह देण्यात येणार आहे. या कार्यक्रमाची सोशल मीडियासाठी MahaWalkathon, WalkF$orWater, SaveSoil-Save Water हे हॅशटॅग वापरण्यात याव्यात, असे आवाहन करण्यात आले आहे.

### जलसंधारण सप्ताह

१५ ऑगस्ट ते २१ ऑगस्ट २०२६ या जलसंधारण सप्ताह दरम्यान राज्यातील सर्व ३६ जिल्ह्यात मृद व जलसंवर्धन रील्स स्पर्धाचे आयोजन करण्यात आले आहे. महाराष्ट्रातील १५ ते ३० वयोगटातील युवक–युवतींच्या कल्पकतेचा उपयोग करुन इनस्टाग्राम (Instagram) च्या माध्यमातून महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात मृद व जलसंधारणाबाबत व्यापक जनजागृती निर्माण करण्यासाठी राज्यव्यापी "Reel for Soil and Water Conservation" स्पर्धा आयोजित करण्यात आले आहे. याची थीम Save Soil, Save Water, Secure Tomorrow अशी असून सोशल मीडियावर SaveSoil Save Water हे हॅशटॅग वापरण्यात यावे, असे आवाहन करण्यात आले आहे. यामुळे एकाच हॅशटॅगखाली विक्रमी संख्येने रील्स तयार होऊन मोठ्या डिजिटल सहभागाची नोंद होणार आहे.

रील स्पर्धा महाराष्ट्रातील सर्व ३६ जिल्ह्यांमध्ये जिल्हास्तरावर आयोजित करण्यात आली असून या स्पर्धेचा पात्र वयोगट १५ ते ३० वर्षे असा ठेवण्यात आला आहे. प्रत्येक स्पर्धकाने ३० ते ६० सेकंदांची Instagram Reel तयार करावी. व्हिडिओ/ रीलच्या सुरुवातीला व्हिडीओ / रीलचा उद्देश, स्वतःचे संपूर्ण नाव, जिल्ह्याचे नाव नमूद सहभागी स्पर्धकांनी करणे आवश्यक आहे. स्पर्धाकांने ठशश्र स्वतःच्या Public Instagram Account वर पोस्ट करावी. स्पर्धकांनी मृद व जलसंधारण विभागाच्या अधिकृत Instagram Account ला Tag करणे बंधनकारक राहील. यासाठी अधिकृत हॅशटॅग #Save Soil Save Water वापरणे अनिवार्य राहणार आहे.

स्पर्धेसाठी मान्यता दिलेला एक अधिकृत QR Code तयार करण्यात येईल. QR Scan केल्यानंतर नोंदणी Reel Link Submit जिल्हा निवड? Verification ? सहभाग प्रमाणपत्र अशी सोपी प्रक्रिया असणार आहे. Instagram हॅशटॅगबरोबर स्वतंत्र डिजिटल नोंदणी केल्यामुळे शासनाकडे प्रत्येक सहभागीची अधिकृत नोंद उपलब्ध राहणार आहे. रील्स अपलोड करण्याचा कालावधी १५ ते २१ ऑगस्ट २०२६ असा आहे.

### रील्स बनवण्यासाठी विषय

माती संवर्धन, पाणी बचत, मृदसंधारण, जलसंधारण, मातीची धूप रोखणे, पावसाच्या पाण्याचे संकलन, शेततळे, बंधारे, पाणलोट क्षेत्र विकास, वृक्षारोपण, पर्यावरण संरक्षण, गावातील यशस्वी मृद व जलसंधारण कामे, पारंपरिक मृद व जलसंधारण पद्धती, माती व पाणी वाचविण्याच्या नाविन्यपूर्ण कल्पना, आजचे संवर्धन उद्याचे सुरक्षित भविष्य असे रील्स बनवण्यासाठी विषय देण्यात आले आहेत.

रील्स बनवितांना Storytelling, Acting, Music, Dance, Animation, AI Creative, Comedy, Short Film, Before-After, Drone Visuals किंवा अन्य नाविन्यपूर्ण पद्धतींचा वापर करता येणार आहे. मात्र रीलचा मुख्य संदेश माती आणि पाणी संवर्धनाशी संबंधित असणे आवश्यक राहणार आहे.

रील्स करिता गुणांकन पद्धती पुढील प्रमाणे असणार आहे. विषय व संदेश – ३० गुण, कल्पकता – २५ गुण, प्रभावी सामाजिक संदेश – २० गुण, सादरीकरण व तांत्रिक गुणवत्ता – १५ गुण, Instagram Engagement – १० गुण असे एकूण – १०० गुण असणार आहेत. केवळ Likes qHdm Followers वर विजेता निश्चित न करता तज्ज्ञ परीक्षण आणि Social Media Engagement या दोन्हींचा समतोल ठेवण्यात येणार आहे. गुणांकानुसार विजेत्याची निवड करण्यात येईल.

संपूर्ण राज्यासाठी एकच अधिकृत हॅशटॅग #SaveSoil-SaveWater वापरण्यात येणार असून, प्रत्येक जिल्ह्यातून किमान २५० रील्स आणि राज्यभरातून १० हजार रिल्सचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. या माध्यमातून लाखो नागरिकांपर्यंत डिजिटल स्वरूपात मृद व जलसंधाराणाचा संदेश पोहोचविण्याचा प्रयत्न आहे. रील स्पर्धेत प्रत्येक जिल्ह्यात प्रथम पुरस्कार ?२५ हजार व गौरवचिन्ह, द्वितीय पुरस्कार ?१५ हजार व गौरवचिन्ह आणि तृतीय पुरस्कार १० हजार व गौरवचिन्ह प्रस्तावित आहे. पात्र सहभागींना ई–प्रमाणपत्र तसेच विजेत्यांना विशेष "युवा मृद–जलदूत' म्हणून गौरविण्यात येणार आहे

"एक Reel... मातीसाठी !, एक Reel... पाण्यासाठी !, एक Reel... सुरक्षित भविष्यासाठी !" हा रील्स प्रचारासाठी मुख्य संदेश आहे.

### जलसंधारण अभियान


या स्पर्धेसोबतच १५ ऑगस्ट २०२६ ते २६ जानेवारी २०२७ या जलसंधारण अभियानादरम्यान राज्यातील सर्व ३६ जिल्ह्यात शाळा व महाविद्यालयांमध्ये निबंध स्पर्धा (जलसंधारणाचे महत्त्व, पाण्याचे महत्व, जल है तो कल है, जलसंवर्धन उपाय, घरातील पाण्याचा वापर – Water Budget), चित्रकला / पोस्टर स्पर्धा– जलसंवर्धन उपाय, पाणी बचत उपाय, Rainwater Harvesting., वाद–विवाद स्पर्धाः (विषय– जलसंधारण शासनाची जबाबदारी कि जनतेची जबाबदारी, इतर विषय), एक शाळा– एक शोषखड्डा उपक्रम राबविणे, सर्व शाळांमध्ये पाणी बचतीचे महत्व विद्यार्थांना सांगणे., जलमित्र / जलदूत घोषित करणे, २१ ऑगस्ट रोजी शाळेत माजी मुख्यमंत्री दिवंगत सुधाकरराव नाईक यांच्या फोटोस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करणे, २१ ऑगस्ट रोजी मृद व जलसंधारणाची शपथ घेणे, २१ ऑगस्ट रोजी प्रमाणपत्र / सन्मानचिन्ह / पुरस्कार वितरण करणे, २१ ऑगस्ट रोजी गावातील किंवा शहरातील जलतज्ञ/प्रतिष्ठीत व्यक्ती यांना प्रमुख पाहूणे म्हणून आमंत्रित करणे असे कार्यक्रम घेण्यात यावेत.

उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या शाळा व महाविद्यालयांना आणि उत्कृष्ट सादरीकरण करणाऱ्या विद्यार्थ्यांना २६ जानेवारी रोजी पालकमंत्र्यांच्या हस्ते प्रशस्तीपत्रक व सन्मानचिन्ह देण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

**संकलन–गजानन पाटील,**
विभागीय संपर्क अधिकारी,
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.

## 'एम्स' नागपूरचा दिलासा: १४ वर्षीय सिकलसेलबाधित बालकाला नवजीवन

**नागपूर:**–वारंवार येणारा अशक्तपणा, थकवा आणि आजारपणामुळे शिक्षणापासून दुरावलेल्या एका १४ वर्षीय सिकलसेलबाधित बालकाला नागपूरच्या 'ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस' (एम्स) मधील पेडियाट्रिक एनसीडी (छउऊ) क्लिनिकमुळे नवजीवन मिळाले आहे. उमंग (नाव बदललेले) असे या बालकाचे नाव असून 'एम्स'मध्ये मिळालेल्या सर्वसमावेशक उपचारांमुळे त्याच्या आरोग्यात कमालीची सुधारणा झाली आहे.



सततच्या आजारपणाने शिक्षण सुटण्याच्या मार्गावर उमगला लहानपणापासूनच सतत अशक्तपणा आणि प्रचंड थकवा जाणवत होता. यामुळे त्याचे आरोग्य ढासळले होते आणि त्याच्या दैनंदिन अभ्यासावर तसेच शाळा उपस्थितीवर गंभीर परिणाम झाला होता. पालकांनी विविध रुग्णालयांचे उंबरठे झिजवले; मात्र आजाराचे मूळ कारण आणि योग्य उपचार न मिळाल्याने त्याची प्रकृती चिंताजनकच राहिली. अखेर या समस्येवर कायमस्वरूपी आणि योग्य उपचारांच्या आशेने पालकांनी 'एम्स' नागपूर गाठले.

'एम्स'मध्ये सिकलसेलचे अचूक निदान व उपचार

'एम्स'च्या बालरोग एनसीडी क्लिनिकमध्ये बालकाची सखोल तपासणी केली असता त्याला 'सिकलसेल ॲनिमिया' (Sickle Cell Anemia) असल्याचे निदान झाले. डॉक्टरांच्या पथकाने तातडीने त्याच्यावर दीर्घकालीन वैद्यकीय उपचार सुरू केले. यामध्ये केवळ औषधोपचारच नव्हे, तर आजाराच्या व्यवस्थापनासाठी खालील महत्त्वाच्या बाबींवर भर देण्यात आला:

पालकांचे विशेष समुपदेशन: बालकाच्या वडिलांना औषधांचे नियमित सेवन (Treatment Adherence) किती महत्त्वाचे आहे, याचे महत्त्व पटवून देण्यात आले.

आहार अनब पाण्याचे महत्त्व: सिकलसेलच्या रुग्णांसाठी शरीरातील पाण्याचे प्रमाण (Hydration) टिकवून ठेवणे आणि पौष्टिक आहार देणे किती गरजेचे आहे, याबद्दल मार्गदर्शन करण्यात आले.

संसर्ग प्रतिबंध व धोक्याच्या सूचना: बालकाला संसर्गापासून (Infection) कसे वाचवावे आणि तातडीने वैद्यकीय मदतीची गरज भासल्यास धोक्याची लक्षणे कशी ओळखावीत, याचे सविस्तर शिक्षण पालकांना देण्यात आले.

### आरोग्यात मोठी सुधारणा; पालकांनी मानले आभार

'एम्स'नागपूर येथे मिळालेले योग्य उपचार आणि नियमित पाठपुराव्यामुळे (Follow-up) उमंगच्या आरोग्यात आता मोठी सुधारणा झाली आहे.

तो आता पुन्हा एकदा पूर्ण उत्साहाने शाळेत जाऊ लागला असून दैनंदिन उपक्रमांत सक्रियपणे सहभागी होत आहे. वेळेवर मिळालेल्या अचूक निदानामुळे आणि डॉक्टरांच्या योग्य मार्गदर्शनामुळे मुलाचे आयुष्य पुन्हा पूर्वपदावर आल्याने पालकांनी 'एम्स' च्या वैद्यकीय पथकाचे मनःपूर्वक आभार मानले आहेत.

## जि.प.व शासकीय कर्मचारी पतसंस्थेच्या गोंदिया शाखाध्यक्षपदी कन्हैयालाल रहांगडाले यांची निवड



**तिरोडा:**–जिल्हा परिषद व शासकीय कर्मचारी पतसंस्था मर्यादित, भंडारा या संस्थेच्या गोंदिया शाखाध्यक्षपदी कन्हैयालाल साधुजी रहांगडाले यांची बहुमताने निवड करण्यात आली.११ ऑगस्ट २०२६ रोजी कोहमारा येथील शाखा कार्यालयात संस्थेचे अध्यक्ष संजीव बावनकर यांच्या अध्यक्षतेखाली सर्व संचालकांची सभा घेण्यात आली. या सभेत गोंदिया शाखाध्यक्षपदासाठी झालेल्या निवडीत कन्हैयालाल साधुजी रहांगडाले यांची बहुमताने निवड करण्यात आली.

जिल्हा परिषद व शासकीय कर्मचारी पतसंस्था मर्यादित, भंडारा ही भंडारा व गोंदिया या दोन्ही जिल्ह्यांतील सर्वात मोठी पगारदार कर्मचारी पतसंस्था असून संस्थेची वार्षिक उलाढाल सुमारे ७०० कोटी रुपये असल्याचे सांगण्यात आले.

रहांगडाले यांच्या निवडीबद्दल संस्थेचे अध्यक्ष संजीव बावनकर, उपाध्यक्ष विजय डोये, माजी उपाध्यक्ष शंकर चव्हाण, सर्व शाखाध्यक्ष व संचालक तसेच महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाचे राज्य संघटक नुतन बांगरे, विभागीय अध्यक्ष केदार गोटेफोडे, अय्युब खान, राज्य पदाधिकारी उमाशंकर पारधी, जिल्हा उपाध्यक्ष राजू गुन्हेवार, माजी संचालक जितेंद्र डहाटे, डी. डी. रिनायत, तालुकाध्यक्ष शीतल कनपटे, सरचिटणीस विजय पारधी, कार्याध्यक्ष शैलेंद्र कोचे, नरेश पटले, राजेश पटले, आर. डी. ढोरे, दिलीप हिरापुरे, राजकुमार चामट, सी. एस. पटले, यू. पी. बिसेन, नरेंद्र आगाशे, धननपाल पटले तसेच सर्व संघ पदाधिकारी व मित्रमंडळींनी अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.कन्हैयालाल रहांगडाले यांच्या नेतृत्वाखाली गोंदिया शाखेच्या कार्याला अधिक गतिमानता मिळेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

# जलसंधारणातून घडवूया बारमाही हिरवा महाराष्ट्र

पाऊस पडतो तेव्हा आपण आनंदतो; पण तोच पाऊस वाहून जातो तेव्हा त्याच्याकडे दुर्लक्ष करतो. आकाशातून पडणारा प्रत्येक थेंब जमिनीवर थांबविणे, तो जमिनीत मुरविणे, भूजलपातळी वाढविणे आणि उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करणे, हीच आजच्या महाराष्ट्राची सर्वात मोठी गरज आहे. म्हणूनच यंदा २१ ऑगस्ट रोजी साजरा होणारा जलसंधारण दिन हा केवळ शासकीय कार्यक्रम न राहता लोकसहभागाची नवी सुरुवात ठरली पाहिजे.

महाराष्ट्र शासनाने माजी मुख्यमंत्री स्व. सुधाकरराव नाईक यांच्या जन्मदिनी, म्हणजेच २१ ऑगस्टला दरवर्षी ङ्गजलसंधारण दिनफ साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामागे जलसंधारण क्षेत्रातील सुधाकरराव नाईक यांच्या योगदानाचे स्मरण आणि जलसंधारणाची लोकचळवळ अधिक व्यापक करण्याचा उद्देश आहे. या दिवशी जलपूजन, विविध जलसंधारण कामांचे भूमिपूजन व लोकार्पण, श्रमदान, जनजागृती, उत्कृष्ट अधिकारी–कर्मचाऱ्यांचा गौरव आदी उपक्रम राबविण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.याच पार्श्वभूमीवर राज्यात जलसंधारण दिनाच्या निमित्ताने आठवडाभर विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत.

स्वातंत्र्यदिनाच्या ध्वजारोहण कार्यक्रमात शासकीय कार्यालयांमध्ये मृद व जलसंधारणाची शपथ घेऊन या लोकचळवळीची सुरुवात करण्यात आली. २१ ऑगस्ट रोजी "महा वॉकेथॉन–वॉक फॉर वॉटर', रील्स स्पर्धा, जलपूजन, श्रमदान आणि जनजागृतीचे उपक्रम नागरिकांना सहभागी करून घेण्यासाठी आयोजित केले जात आहेत.

### जलसंधारण म्हणजे काय

पावसाचे पाणी शक्य तितक्या मोठ्या प्रमाणात जमिनीवर अडविणे, त्याचा वेग कमी करणे, जमिनीत मुरविणे, भूजलाचे पुनर्भरण करणे, जलस्रोतांची साठवण क्षमता वाढविणे आणि उपलब्ध पाण्याचा कार्यक्षम वापर करणे, याला व्यापक अर्थाने जलसंधारण म्हणता येईल. जलसंधारण म्हणजे केवळ बंधारा बांधणे नव्हे. पाण्याचा प्रत्येक थेंब जिथे पडतो, तिथेच त्याचा अधिकाधिक उपयोग करणे, ही त्यामागची मूलभूत संकल्पना आहे.

महाराष्ट्रासाठी ही बाब अधिक महत्त्वाची आहे. राज्याच्या भौगोलिक क्षेत्रापैकी सुमारे ५२ टक्के क्षेत्र अवर्षणप्रवण आहे. पावसाचे भौगोलिक आणि कालिक वितरण असमान आहे. काही भागात अतिवृष्टी होते, तर काही भागात पावसाची प्रतीक्षा करावी लागते. त्यामुळे ङ्गपाणी आहे, पण योग्य वेळी आणि योग्य ठिकाणी नाहीफ हीच मोठी समस्या आहे. जलसंधारणातून या विसंगतीवर मात करता येते.

### महाराष्ट्राच्या जलसंधारणाची मुळे

महाराष्ट्रात जलसंधारणाची परंपरा नवी नाही. गावागावातील तलाव, बंधारे, पाझर तलाव, विहिरी आणि पारंपरिक जलव्यवस्थापन ही ग्रामीण जीवनाची पूर्वापार साधने आहेत. ही परंपरा थेट छत्रपती शिवरायांचा काळापर्यंत जाते. गड किल्ल्यावर पावसाचे पाणी साठवण्याची मोठी परंपरा आहे. यावर महाराष्ट्राने शिवकालीन पाणी साठवण योजनाही सुरु केली आहे. आधुनिक शासकीय पातळीवर मात्र जलसंधारणाला स्वतंत्र संस्थात्मक दिशा मिळाली ती स्वतंत्र जलसंधारण विभागाच्या स्थापनेमुळे.महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांनीही १९७२ च्या दुष्काळानंतर जलसंधारण माध्यमातून "जलक्रांन्ती' घडवून आणली होती. त्यांनी पाणी अडवा पाणी जिरवा ही संकल्पना राबवून पाणलोट क्षेत्र वाढवले मोठ्या धरणांपेक्षा बॅरेजेसला महत्व दिले.

### जलयुक्त शिवारातून नव्या पर्वाला सुरुवात

जलसंधारणाला मोठ्या प्रमाणावर लोकचळवळीचे स्वरूप देण्याच्या दृष्टीने २०१४ नंतरचा काळ महत्त्वाचा ठरतो. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पहिल्या मुख्यमंत्रिपदाच्या कार्यकाळात ५ डिसेंबर २०१४ च्या शासन निर्णयानुसार जलयुक्त शिवार अभियान सुरू करण्यात आले. या योजनेतून पुढे हजारो हेक्टर सिंचन क्षमता निर्माण झाली. लक्षावधी टीएमसी पाणी साठा निर्माण झाला. हजारो गावे पाणीदार झाली. त्यांचा शाश्वत विकास झाला.

आज जलयुक्त शिवार २.०च्या माध्यमातूनही जलसंधारण, जलसाक्षरता, लोकसहभाग आणि उपलब्ध भूजलाच्या शाश्वत वापरावर भर दिला जात आहे. मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनीही स्पष्टपणे सांगितले आहे की, महाराष्ट्राच्या दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी जलसंधारणातून परिवर्तन घडविणे आवश्यक आहे.

### योजनांची ताकद, लोकसहभागाची साथ

महाराष्ट्राने जलसंधारणासाठी अनेक मार्ग स्वीकारले आहेत. ङ्गमागेल त्याला शेततळेफयोजनेला २०१६ मध्ये सुरुवात करून शेतकऱ्यांना स्वतःची संरक्षित सिंचन व्यवस्था निर्माण करण्याची संधी देण्यात आली.

"गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार' ही संकल्पना तर जलसंधारण आणि शेती यांची सांगड घालणारी आहे. धरणातील गाळ काढल्यामुळे जलाशयाची साठवण क्षमता वाढते आणि तोच गाळ शेतात टाकल्यामुळे जमिनीची सुपीकता वाढण्यास मदत होते. २०२४ मध्ये ही योजना कायमस्वरूपी राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. याशिवाय विहीर पुनर्भरण, रेन वॉटर हार्वेस्टिंग, नाला खोलीकरण व रुंदीकरण, सिमेंट बंधारे, गॅबियन बंधारे, वनराई बंधारे, सलग समतल चर, शेततळी, जलस्रोतांमधील गाळ काढणे, बांधावर वृक्ष व बांबू लागवड अशा असंख्य उपाययोजना राज्यात राबविल्या जात आहेत.

### देशातील प्रेरणादायी उपक्रम

राजस्थानच्या अलवरमध्ये पारंपरिक "जोहड' या पावसाच्या पाण्याच्या साठवण संरचनांचे पुनरुज्जीवन करून गावकऱ्यांनी जलव्यवस्थापनाचे प्रभावी मॉडेल उभे केले. जलतज्ज्ञ आणि "वॉटर मॅन ऑफ इंडिया' म्हणून ओळखले जाणारे राजेंद्र सिंह यांच्या नेतृत्वाखालील लोकसहभागातून कोरड्या प्रदेशात जलस्रोत पुनरुज्जीवित झाले आणि अरवरीसारख्या नद्यांना पुन्हा प्रवाह मिळाला.

महाराष्ट्रात राळेगणसिद्धी आणि हिवरे बाजार ही दोन उदाहरणे तितकीच प्रेरणादायी आहेत. राळेगणसिद्धीत नाला बांध, गली प्लगिंग, समतल चर, पाझर तलाव आणि लोकसहभागातून दुष्काळी गावाचा कायापालट झाला. हिवरे बाजारने पाण्याचे बजेट, पिकांचे नियोजन, ठिबक सिंचन, भूजल पुनर्भरण आणि जलसंधारण यांची सांगड घालत जलसुरक्षेचे आदर्श मॉडेल निर्माण केले.

### नागरिकांनी काय करायचे

शासन आपले काम करीत आहे; परंतु जलसंधारणाची खरी यशोगाथा नागरिकांच्या सहभागाशिवाय पूर्ण होणार नाही. या पावसाळ्यात प्रत्येक नागरिकाने आपल्या घराच्या छतावरील पाणी साठविण्याची किंवा जमिनीत मुरविण्याची व्यवस्था करावी. गावांनी पाण्याचा ताळेबंद तयार करावा. शेतकऱ्यांनी शेततळी, बांधबंदिस्ती, विहीर पुनर्भरण, ठिबक–सिंचन आणि पिकांच्या पाण्याच्या गरजेनुसार नियोजन करावे. गावातील नाले, तलाव, बंधारे आणि पारंपरिक जलस्रोत यांची स्वच्छता व देखभाल करावी. शक्य तेथे श्रमदान करावे. पाणी वाया जाणार नाही, याची प्रत्येक कुटुंबाने काळजी घ्यावी.आणि पावसाळा सुरु आहे. वृक्ष लागवडीत कुटूंबाने दरवर्षी एक या प्रमाणे वृक्ष लागवड करावी.




जलसंधारण हा केवळ मृद व जलसंधारण विभागाचा विषय नाही; तो कृषीचा, ग्रामविकासाचा, पर्यावरणाचा, अर्थव्यवस्थेचा आणि भविष्यातील पिढ्यांचा विषय आहे. कारण पाणी वाचले तर शेती वाचेल, शेती वाचली तर गावाची अर्थव्यवस्था वाचेल आणि गाव समृद्ध झाले तर महाराष्ट्र समृद्ध होईल.

म्हणून २१ ऑगस्टचा जलसंधारण दिन हा केवळ एक दिवस साजरा करण्याचा दिवस न राहता प्रत्येकाच्या मनात एक संकल्प निर्माण करणारा दिवस ठरू दे. चला !जलसंधारणातून बारमाही हिरवा महाराष्ट्र घडवूया!

**प्रवीण टाके**
उपसंचालक (माहिती)
विभागीय माहिती कार्यालय
छत्रपती संभाजीनगर
मो.क्र.९७०२८५८७७७

स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,शिवनगर गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ९४२३११२४३१ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)

# बालकांच्या संरक्षणासाठी समन्वय आणि कायद्याची प्रभावी अंमलबजावणी आवश्यक

## पोलीस अधिकारी प्रशिक्षण कार्यशाळेत बालस्नेही दृष्टिकोनावर भर; अधिकाऱ्यांचा सहभाग

**गोंदिया :–** बालकांच्या संरक्षणासंदर्भातील कोणत्याही गुन्ह्यात तडजोड केली जाणार नाही. बालकांना न्याय मिळवून देण्यासाठी कायदेशीर बाबी सक्षम पणे हाताळण्याबरोबरच त्यांचे सुरक्षित पुनर्वसन आणि समाजात पुर्नएकात्मीकरण करण्यासाठी बालस्नेही वातावरण निर्माण करणे अत्यावश्यक असल्याचे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाचे सदस्यांनी केले.



महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, मुंबई आणि होप फॉर द चिल्ड्रेन फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने गोंदिया व भंडारा जिल्ह्यातील बाल कल्याण पोलीस अधिकारी, बाल कल्याण समिती, बाल न्याय मंडळ, जिल्हा बाल संरक्षण कक्ष आणि चाईल्ड हेल्पलाईनच्या अधिकारी–कम ‘चाऱ्यांसाठी लैंगिक अपराधांपासून बालकांचे संरक्षण अधिनियम (झजउडज) २०१२ तसेच बाल न्याय अधिनियम २०१५ या विषयांवरील सचेतन कार्यशाळेचे आयोजन पोलीस मुख्यालयातील प्रेरणा सभागृह, कारंजा येथे करण्यात आले. या कार्यशाळेत बालकांच्या सुरक्षेसाठी राज्य बाल हक्क संरक्षण आयोग कटिबद्ध असल्याचा ठाम संदेश देण्यात आला.

यावेळी आयोगाच्या सदस्या गीतांजली बुटी यांनी बालकांशी संबंधित सर्व यंत्रणांनी संवेदनशीलता आणि समन्वयाने कार्य करण्याची गरज व्यक्त केली. बालके हे देशाचे भविष्य असून त्यांच्या हक्कांचे संरक्षण आणि सुरक्षित बालपण सुनिश्चित करण्यासाठी समाजातील प्रत्येक घटकाने बालस्नेही दृष्टिकोन स्वीकारणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रविण भुजाडे यांनी रस्त्यावर राहणाऱ्या तसेच भिक्षावृत्तीत अडकलेल्या बालकांबाबत सामाजिक दायित्व स्वीकारून पोलिसांनी प्रभावी उपाययोजना कराव्यात, असे आवाहन केले. बाल भिक्षेकरी प्रणाली संपुष्टात आणण्यासाठी सर्व यंत्रणांनी एकत्रित प्रयत्न करण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली.

कार्यशाळेपूर्वी आयोगाचे सदस्य प्रविण भुजाडे व गीतांजली बुटी यांनी गोंदिया येथील शासकीय मुलांचे निरीक्षणगृह (बालगृह) आणि आसरा शिशुगृहाला भेट देऊन तेथील सुविधा व व्यवस्थेची पाहणी केली. बालकांसाठी उपलब्ध सुविधा समाधानकारक असल्याचे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून दीपप्रज्वलनाने कार्यशाळेचे उद्घाटन करण्यात आले. कार्यशाळेच्या पहिल्या सत्रात महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाचे माजी सदस्य ॲड. संजय सेंगर यांनी झजउडज कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणी विषयी सविस्तर मार्गदर्शन केले. दुसऱ्या सत्रात ॲड. परम आनंद यांनी बाल न्याय कायद्यातील काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या बालकांबाबत माहिती दिली, तर वसीम शेख यांनी विधी संघर्षग्रस्त बालकांच्या पुनर्वसन प्रक्रियेवर मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी तुषार पौनिकर यांनी केले. सूत्रसंचालन बाल संरक्षण अधिकारी गजानन गोबाडे यांनी केले, तर आभार रविंद्र टेंभूर्णे यांनी मानले. कार्यशाळेस परिविक्षा अधिकारी रेश्मा मोरे, सहायक पोलीस निरीक्षक प्रीती कुळमेथे यांच्यासह सुमारे १३५ पोलीस अधिकारी उपस्थित होते.

# शिक्षण सचिव देओल यांची पीएमश्री जि.प.भारतीय विद्यालयाला भेट !

**एकोडी :–** महाराष्ट्र राज्याचे शिक्षण सचिव माननीय रणजितसिंह देओल यांनी १४ ऑगस्ट रोजी मपीएम श्रीफजिल्हा परिषद भारतीय विद्यालय एकोडी (दांडेगाव) या शाळेला सदिच्छा भेट देऊन शैक्षणिक व भौतिक उपक्रमांची पाहणी केली. या उच्चस्तरीय भेटीदरम्यान जिल्हाधिकारी मंदार पत्की, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी झेनिथ चंद्र दोन्तुला, मडायटफ चेप्राचार्य हिवारे, माध्यमिक शिक्षणाधिकारी महामुनी, प्राथमिक शिक्षणाधिकारी खंदारे यांच्यासह प्रमुख सनदी अधिकारी व शिक्षण विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.



शाळेत आगमन होताच प्राचार्य एम. एच. पटले, टी. बी. बावनकुळे आणि प्रमोद पटले यांनी शाळेमाफ ‘त राबवल्या जाणाऱ्या विविध शैक्षणिक व सहशालेय उपक्रमांची सविस्तर माहिती दिली. या प्रसंगी शिक्षण सचिवांनी पीएम श्री योजनेअंतर्गत शाळा कशी अधिक तंत्रस्नेही, गुणवत्तापूर्ण आणि समृद्धफ आदर्श शाळाफ म्हणून विकसित करता येईल, यावर सखोल मार्गदर्शन केले.

शिक्षण सचिवांनी शाळ–‘तील अद्ययावत भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र व जीवशास्त्र प्रयोगशाळांची पाहणी केली. यावेळी विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष विज्ञान प्रयोग करून दाखवले. विशेषतः भौतिकशास्त्राच्या मइलेक्ट्रिक सर्किटफ प्रयोगाचे एका विद्यार्थ्याने केलेले अभ्यासपूर्ण व प्रभावी सादरीकरण ऐकून शिक्षण सचिव रणजितसिंह देओल यांनी विद्यार्थ्याला शाबासकी दिली. तिन्ही विज्ञान शाखांमधील विद्यार्थ्यांशी त्यांनी थेट संवाद साधून प्रश्न विचारले असता विद्यार्थ्यांनी दिलेला उत्स्फूर्त व आत्मविश्वासपूर्ण प्रतिसाद पाहून त्यांनी समाधान व्यक्त केले.

या प्रसंगी शाळा समितीच्या अध्यक्षा सौ. अश्विनीताई पटले, उपाध्यक्ष अजबराव रिनायत, गटशिक्षणाधिकारी मेश्राम, केंद्र समन्वयक नरेंद्र गौतम, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अजय अंबुले, उपाध्यक्ष मयुरी म ‘श्राम यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व ग्रामस्थ उपस्थित होते.

# आमदार बडोलेंच्या हस्ते ऐतिहासिक प्रतापगड येथे नवनिर्मित ग्रामपंचायत भवनाचे लोकार्पण

**अर्जुनी–मोरगाव :–**”ग्राम पंचायत भवन हे केवळ प्रशासकीय कामकाजाचे केंद्र नसून गावाच्या सर्वांगीण विकासाचा मुख्य आधार आहे. ग्रामविकासाची कामे हीच खरी लोकसेवा असून ऐतिहासिक महत्त्व असलेल्या प्रतापगडच्या विकासाला आपण नेहमीच प्राधान्य देऊ,” अशी ग्वाही आमदार राज–कुमार बडोले यांनी दिली.



अर्जुनी–मोरगाव तालुक्यातील ऐतिहासिक तीर्थक्षेत्र व पर्यटनस्थळ असलेल्या प्रतापगड येथे २५ लाख रुपये निधीतून साकारण्यात आलेल्या नवनिर्मित ग्रामपंचायत भवनाचा लोकार्पण सोहळा १५ ऑगस्ट रोजी स्वातंत्र्यदिनाच्या शुभमुहूर्तावर उत्साहात पार पडला. आमदार राजकुमार बडोले यांच्या हस्ते व गोंदिया जिल्हा परिषद अध्यक्ष लायकराम भेंडारकर यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम संपन्न झाला.

यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना आमदार बडोले यांनी सांगितले की, “नागरिकांना शासकीय सेवा व सुविधा अधिक सुलभतेने मिळाव्यात आणि शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी व्हावी, यासाठी सक्षम प्रशासकीय व्यवस्था आवश्यक आहे. रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता यांसारख्या पायाभूत सुविधा पुरवण्यासाठी लोकप्रतिनिधी व प्रशासनाने समन्वयाने काम करणे गरजेचे आहे.”

अध्यक्षीय भाषणात जिल्हा परिषद अध्यक्ष लायकराम भेंडारकर यांनी, या नव्या इमारतीम ‘ळे ग्रामस्थांची मोठी सोय झाली असून ग्रामविकासाच्या गुणवत्तापूर्ण कामांसाठी जिल्हा परिषदेकडून सदैव पूर्ण सहकार्य राहील, असे आश्वस्त केले.

या सोहळ्याला महिला व बालकल्याण सभापती पौर्णिमा ढेंगे, जि. प. सदस्य यशवंत गण–वीर, पं. स. सभापती आम्रपाली डोंगरवार, उपसभापती संदीप कापगते, गटविकास अधिकारी पल्लवी वाडेकर, सहाय्यक गटविकास अधिकारी गणेश माली, विस्तार अधिकारी ए. सी. राणे, लिंबाजी कुटे, सरपंच प्रशासक भोजराम लोगडे व ग्रामपंचायत अधिकारी नरेंद्र गोमासे यांची प्रमुख उपस्थिती होती.तसेच दीनदयाल डोंगरवार, किशोर तरोणे, योगेश नाकाडे, ठाणेदार ढेकणे, व्यंकट खोब्रागडे, पं. स. सदस्य नूतन–लाल सोनवाणे, होमराज पुस्तोळे, शारदाताई बडोले, राजहंस ढोक, प्रशांत शहारे, उमेश मडावी, प्रकाश सलामे, पोलीस पाटील योगेश जनबंधू यांसह अनेक स्थानिक लोकप्रतिनिधी, अधिकारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नवनिर्मित सुसज्ज ग्रामपंचायत भवनामुळे गावातील प्रशासकीय कामांना गती मिळणार असल्याने प्रतापगडच्या ग्रामस्थांमधून तीव्र समाधान व्यक्त केले जात आहे.

### ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजनेसाठी प्रवेश अर्ज प्रक्रिया सुरू

**गोंदिया:** इतर मागास प्रवर्ग (ओबीसी), विमुक्त जाती–भटक्या जमाती (व्हीजेएनटी) व विशेष मागास प्रवर्ग (एसबीसी) प्रवर्गातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना व पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयंम योजना या योजनांसाठी सन २०२६–२७ या शैक्षणिक वर्षातील नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे ऑनलाइन अर्ज भरण्याची प्रक्रिया १२ ऑगस्ट २०२६ पासून सुरू झाली आहे.

शासनाच्या http://hmasnew.mahait.org या ऑनलाइन पोर्टलवर १२ वी नंतरच्या व्यावसायिक व बिगर व्यावसायिक पदवी तसेच पदव्युत्तर अभ्यासक्रमांना प्रवेश घेतलेल्या पात्र विद्यार्थ्यांनी अर्ज भरावा. ऑनलाइन अर्जाची प्रिंट व आवश्यक कागदपत्रे संबंधित शासकीय वसतिगृहात सादर करावीत, असे आ–वाहन करण्यात आले आहे.

अधिक माहितीसाठी इमाव, विमाप्र व विजाभज मुला–मुलींचे शासकीय वसतिगृह, गोंदिया येथील गृहपाल अश्विनी दिघोरे (मो. ९७६५०८४०९०), मंगलेश गिरी (मो. ८७८८२३५७६७) तसेच सहाय्यक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण कार्यालय, गोंदिया यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन सहाय्यक संचालकांनी केले आहे.

# जलसंधारण ही लोकचळवळ बनली तरच जलसमृद्ध गावांचे स्वप्न साकार होईल : आमदार राजकुमार बडोले

**गोंदिया:–** जलसंधारण सप्ताहानिमित्त सडक अर्जुनी तालुक्यातील ग्रामपंचायत कनेरी येथे जलपूजन व वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचा शुभारंभ आमदार राजकुमार बडोले यांच्या हस्ते करण्यात आला.



यावेळी आमदार बडोले म्हणाले, जलसंधारण ही केवळ शासकीय योजना नसून ती लोकचळवळ बनली पाहिजे. प्रत्येक नागरिकाने पावसाच्या प्रत्येक थेंबाचे संवर्धन करण्यासाठी पुढाकार घेतला तरच जलसमृद्ध गावांचे स्वप्न साकार होईल. त्यांनी जलसंधारणाचे महत्त्व विषद करत जल, मृदसंधारण आणि वृक्षारोपण या तिन्ही बाबींचा समन्वय साधून गावाच्या विकासासाठी सर्वांनी एकत्रितपणे काम करण्याचे आ–वाहन केले.

या कार्यक्रमास जिल्हा परिषद सदस्य कविता रंगारी, पंचायत समिती सभापती चेतन वडगाये, सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जलसंधारण सप्ताहानिमित्त शाळा व महाविद्यालयांमध्ये रांगोळी, पोस्टर व रील स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच तालुका आमगाव अंतर्गत ग्रामपंचायत पाऊलदौना येथील अमृत सरोवर परिसरात वृक्षारोपण करून जलसंधारण व मृदसंधारणाबाबत जनजागृती करण्यात आली. नागरिकांनी जलसंधारण सप्ताहात सक्रिय सहभाग नोंदवून जलसंवर्धनाच्या चळवळीत सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले.

स्वातंत्र्यदिनी मुख्य ध्वज–ारोहण सोहळ्यात जिल्ह्याचे पालकमंत्री इंद्रनील नाईक यांच्या आवाहनानुसार १५ ते २१ ऑगस्ट या कालावधीत जलसंधारण सप्ताहाची सुरुवात करण्यात आली. या दिवशीच्या मुख्य कार्यक्रमात जलसंधारणाची शपथ घेण्यात आली आणि बोधचिन्हाचे विमोचन करण्यात आले.यानिमित्त जिल्ह्यातील सर्व तहसील व पंचायत समिती कार्यालयांमध्ये जलसंधारणाची शपथ घेण्यात आली असून सप्ताहादरम्यान विविध जनजागृतीपर उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे.

# खनिकर्म राज्यमंत्र्यांचा लॉयड्स कौशल्य संस्थेतील विद्यार्थ्यांशी संवाद

**गडचिरोली :–** बदलत्या औद्योगिक गरजांनुसार आधुनिक कौशल्ये आत्मसात करून तरुणांनी आत्मविश्वासाने रोजगार आणि उद्योजकतेच्या संधींकडे वाटचाल करावी. कौशल्य प्रशिक्षणाचा उपयोग केवळ नोकरी मिळिवण्यासाठी न करता स्वतःची क्षमता विकसित करण्यासाठीही करावा, असे प्रतिपादन खनिकर्म राज्यमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी केले.



रविवारी लॉयड्स मिशन फॉर ग्लोबल स्किल्स अँड एंटरप्रेन्योरशिप अकादमीला भेट देऊन डॉ.भोयर यांनी तेथील प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधला. यावेळी आमदार डॉ.मिलिंद नरोटे, जिल्हा खनिकर्म अधिकारी इम्रान शेख तसेच संबंधित कंपनीचे अधिकारी उपस्थित होते.

यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांकडून त्यांच्या प्रशिक्षणाचा अनुभव, निवडलेले ट्रेड, प्रशिक्षणातून मिळणारी कौशल्ये तसेच भविष्यातील उद्दिष्टंविषयी जाणून घेतले.संवादादरम्यान डॉ.भोयर यांनी विद्यार्थ्यांना या प्रशिक्षण संस्थेत प्रवेश घेण्यामागील प्रेरणा काय होती, येथे आल्यानंतर कोणती नवीन कौशल्ये शिकायला मिळाली आणि प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर कोणत्या क्षेत्रात काम करण्याची इच्छा आहे, याबाबत प्रश्न विचारले. विद्यार्थ्यांनी आपण घेत असलेल्या प्रशिक्षणाची माहिती तसेच संबंधित ट्रेडम धील कौशल्यांबाबत त्यांना सांगितले. विद्यार्थ्यांचा आत्म विश्वास, विषयाचे ज्ञान आणि प्रशिक्षणाबाबतची स्पष्टता याचे डॉ.भोयर यांनी कौतुक केले.

यावेळी त्यांनी प्रशिक्षण केंद्राची पाहणी करून विविध प्रशिक्षण सुविधा व उपलब्ध पायाभूत सुविधांची माहिती घेतली. उद्योगांच्या प्रत्यक्ष गरजांशी सुसंगत प्रशिक्षण तरुणांना मिळाल्यास त्यांच्या रोजगारक्षमतेत वाढ होण्यास मदत होते. त्याचबरोबर कौशल्याधारित उद्योजकतेच्या माध्यमातून तरुण स्वतःसह इतरांसाठीही रोजगाराच्या संधी निर्माण करू शकतात, असे त्यांनी सांगितले.

माध्यमांशी संवाद साधताना डॉ.भोयर यांनी गडचिरोलीतील तरुणांसाठी शिक्षण, कौशल्य विकास आणि रोजगाराभिमुख संधी निर्माण करण्यासाठी सुरू असलेल्या प्रयत्नांचे कौतुक केले. जिल्ह्यात औद्योगिक विकासासोबतच स्थानिक मनुष्यबळ कौशल्यसंपन्न होणे आवश्यक असून, अशा प्रशिक्षण संस्थांमुळे उद्योगांसाठी आवश्यक प्रशिक्षित मनुष्यबळ स्थानिक स्तरावर तयार होण्यास मदत होईल, असे नमूद केले.

डॉ.भोयर यांनी कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक बी.प्रभाकरन यांच्या पुढाकाराचेही कौतुक केले. गडचिरोलीसारख्या भागात आधुनिक कौशल्य प्रशिक्षणाच्या सुविधा निर्माण झाल्याने स्थानिक युवकांसाठी नव्या संधींचे दालन खुले होत असून, अशा उपक्रमांचा जिल्ह्याच्या सामाजिक व आर्थिक परिवर्तनात महत्त्व–ाचा वाटा राहील, असे त्यांनी सांगितले.

### खांबी ते बोंडगाव रस्ता जड वाहतुकीसाठी बंद

**गोंदिया:–** सन २०२६ पावस–ाळा पूर्वीचे नियतकालीन निरीक्षण दरम्यान बोंडगाव बाराभाटी रस्त्यावर असलेल्या लहान पुलाच्या स्लॅबचे खालील स्टील पूर्णतः दिसत असल्याने व ते गंजलेल्या अवस्थेत असल्याचे कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.२, गोंदिया व तहसिलदार अर्जुनी मोरगाव यांनी कळिवले आहे.

सदर पुलावरुन जड वाहने गेल्यास पूल क्षतीग्रस्त होवून अपघात व जिवीत हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी मंदार पत्की यांनी मोटार अधिनियम १९८८ चे कलम ११५ चे तरतुदीनु–सार त्यांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये त्यांच्या प्रभावाखाली असलेल्या गोंदिया जिल्ह्यातील अर्जुनी मोरगाव तालुका अंतर्गत बाराभाटी–पिंपळगाव–खांबी–निमगाव–बोंडगाव या पर्यायी मार्गे वळिवणे. बोंडगाव–निमगाव–खांबी–पिंपळगाव–बाराभाटी या पर्यायी मार्गे वळिवणेकरीता खालील अटी व शर्तीच्या आधारे परवानगी देण्यात येत आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाम ार्फत आवश्यक तिथे हाईटवार लावण्याची व्यवस्था करावी. वाहतुक वळिवण्याची व पर्यायी वाहतुक मार्ग उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी सार्वजनिक बांधकाम विभाग व वाहतुक शाखा यांची राहील. वाहतुक मार्गावर आवश्यक तेथे गतिरोधक संबंधित विभागाने लावावे. वाहतुक वळिवल्याबाबत दिशा निर्देशन करणारे फलक व स्वयंसेवकाची व्यवस्था संबंधित विभागाने करावी.

# मा.खासदार बोपचे यांच्या वाढदिवसानिमित्त परशुराम विद्यालयात “PVM Students Bank’ या अभिनव योजनेचा शुभारंभ!

**गोरेगाव:–**तालुक्यातील परशुराम शिक्षण प्रसारक संस्था, गोरेगावचे सचिव तथा माजी खासदार डॉ.खुशालचंद्र बोपचे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून परशुराम विद्यालय, मो–हगाव बु. येथे विविध सामाजिक आणि शैक्षणिक कार्यक्रमांचे अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात आयोजन करण्यात आले होते.सदर दिमाखदार सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी माजी खासदार डॉ.खुशालचंद्र बोपचे उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात परिसर सुशोभीकरण व पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणाऱ्या वृक्षारोपण रोपणाने झाली. यानंतर विद्यालयातील गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते विशेष सत्कार करून त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप मारण्यात आली.



#### विद्यार्थ्यांमध्ये बचतीचे संस्कार रुजवणारी “PVM Students Bank’

या सोहळ्याचे मुख्य आकर्षण म्हणजे विद्यार्थ्यांमध्ये लहानपणा–पासूनच बचतीची आवड आणि आर्थिक शिस्त निर्माण व्हावी या उद्देशाने सुरू करण्यात आलेली “PVM Students Bank” ही योजना होय. अध्यक्षांच्या हस्ते या बँकेचे अधिकृत उद्घाटन करण्यात आले. शालेय स्तरावर विद्यार्थ्यांसाठी सुरू करण्यात आलेली ही बचत बँक म्हणजे परशुराम विद्यालयाचा एक अत्यंत अभिनव, स्तुत्य आणि विद्यार्थी–केंद्रित उपक्रम असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

या कार्यक्रमास बक्षीस वितरक म्हणून सेवानिवृत्त मुख्याध्यापक जगदीश अग्रवाल, तर प्रमुख अतिथी म्हणून उपसरपंच कमलेश राहांगडाले व शिक्षण संस्थेच्या संचालिका श्रीमती सुशीलाबाई बोपचे यांची प्रामुख्याने उपस्थिती लाभली होती. याशिवाय शाळा समितीचे अध्यक्ष, माजी विद्यार्थी, पालक वर्ग आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी या सोहळ्याचे साक्षीदार झाले.

संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स.शिक्षक विन–ोद मेश्राम यांनी केले. तर कार्यक्रमाच्या शेवटी विद्यालयाचे मुख्याध्यापक कृष्णकांत बिसेन यांनी उपस्थित सर्व मान्यवर, पालक, माजी विद्यार्थी, शिक्षक आणि विद्यार्थ्यांचे मनापासून आभार मानले.हा सोहळा यशस्वी करण्यासाठी विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. वृक्षारोपण, गुणवंतांचा गौरव आणि “PVM Students Bank’ सारख्या उपक्रमांच्या माध्यमातून या वाढदिवस सोहळ्याने सामाजिक उत्तरदायित्व, विद्यार्थी विकास आणि बचतीच्या संस्कारांचा एक सुंदर व प्रेरणादायी संदेश दिला.

# खडगे यांच्या अपमानाचा गोंदियात निषेध; जिल्हा काँग्रेस कमिटीकडून भव्य मोर्चा व सत्याग्रह

**गोंदिया:–**अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष तथा राज्यसभेचे विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खडगे यांच्यावर झालेल्या अन्यायाविरोधात गोंदिया जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने तीव्र निषेध नोंदवत भव्य मोर्चा व सत्याग्रह आंदोलनाचे आयोजन करण्यात आले.




उत्तराखंडमधील हल्द्वानी येथे काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खडगे यांची जाहीर सभा पार पडल्यानंतर, हिंदुत्ववादी व दक्षिणपंथी संघटनांनी त्या सभास्थळाचे गंगाजलाने ङ्गशुद्धीकरणफ केल्याचा प्रकार समोर आला आहे. खडगे यांच्या उपस्थितीमुळेच ते स्थान अपवित्र झाल्याचा आरोप करत हे अनुष्ठान करण्यात आले. हा प्रकार अत्यंत चिंताजनक, निंदनीय व प्रतिगामी असल्याची टीका काँग्रेस पक्षाकडून करण्यात येत आहे.

हा लाजीरवाणा प्रकार केवळ काँग्रेस अध्यक्षांचा अपमान नसून, देशातील करोडो नागरिकांचा आणि संविधानाने दिलेल्या समानता, बंधुत्व, सामाजिक न्याय व मानवी सन्मानाचा थेट अपमान आहे. भारतीय संविधानाच्या आधारावर चालणाऱ्या लोकशाही समाजात अशा भेदभावाची आणि जातीयवादी मानसिकतेची कोणतीही जागा असू शकत नाही. असा कोणताही प्रकार काँग्रेस पक्ष आणि देशातील जनता कदापि सहन करणार नाही, असा इशारा आंदोलकांनी दिला.

या घटनेच्या निषेधार्थ गोंदिया जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहण्यात आली. त्यानंतर आंदोलनकर्त्यांनी जयस्तंभ चौकात जोरदार घोषणाबाजी करत परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन केले आणि पुतळ्यासमोरच सत्याग्रह आंदोलन केले.

“देश मनूवादी विचारसरणीने नाही, तर संविधानानेच चालेल!”

“भारतीय जनता पक्ष आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने हे स्पष्टपणे लक्षात ठेवावे की, हा देश कोणत्याही मनूवादी विचारसरणीने चालणार नसून केवळ संविधानाच्या आधारावरच चालेल,” असा इश–ारा काँग्रेस कमिटीचे जिल्हाध्यक्ष अमर वराडे यांनी या प्रसंगी दिला. तसेच, काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खडगे हे दलित समाजाचे प्रतिनिधी असल्यानेच भाजपशी संबंधित संघटनांनी जाणीवपूर्वक हे कृत्य केले असल्याचा गंभीर आरोपही काँग्रेस नेत्यांनी केला.

या आंदोलनात जिल्हा काँग्रेस कमिटीचे प्रमुख नेते व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यात पी. जी. कटरे, राजकुमार पुराम, सुनील भालेराव, वंदना काले,राजकुमार पटले, जीवन शरणागत, रणजीत गण–वीर, मनोज पटनायक, राजभाऊ दोनोडे, विजय फुंडे, आशुतोष साथी, चंद्रकुमार चुटे, अमर रंगारी, ओम पटले, मनीष मेश्राम, देवेंद्र रहांगडाले, शैलेश बहकार, विनोद मडावी, रवी चुटे, रंजीत कासम, प्रल्हाद सलामे, कुलदीप गुप्ता, सावंत राऊत, उत्तम साखरे, अविनाश टेंबरे, प्रदीप राऊत, श्याम गणवीर, सूर्यप्रकाश भगत, अंकेश हरिणखेड़े, अनीता मुनेश्वर, विष्णू नागरीकर यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते प्रामुख्याने उपस्थित होते.

# ग्रामपंचायत भवनाचा लोकार्पण सोहळा उत्साहात संपन्न

**गोंदिया :–**राष्ट्रीय ग्राम स्वराज्य अभियान (ठऋडअ) अंतर्गत मोहगाव बु. येथे २५ लाख रुपये निधीतून साकारण्यात आलेल्या नवनिमि ‘त ग्रामपंचायत इमारतीचा लोकार्पण सोहळा शुक्रवारी (१४ ऑगस्ट) अत्यंत उत्साहात पार पडला. माजी जिल्हा अध्यक्ष तथा जिल्हा परिषद सदस्य पंकज रहांगडाले यांच्या शुभहस्ते व प्रशासक ज्योतिका कुंभरे यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम संपन्न झाला.




कार्यक्रमा दरम्यान उपस्थितांना मार्गदर्शन करताना, ङ्गगावाच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक असलेल्या सर्व पायाभूत सुविधा व मागण्या प्राधान्याने पूर्ण केल्या जातील,ङ्घ असे आश्वासन पंकज रहांगडाले यांनी दिले.

या प्रसंगी व्यासपीठावर पंचायत समिती सदस्य किशोर पारधी, माजी पं. स. सदस्य साहेबलाल कटरे, प्र. स. उपसरपंच कमलेश्वर रहांगडाले, माजी तंटामुक्त समिती अध्यक्ष गणराज पटले, माजी सरपंच खेमराज बेदरे आणि ग्रामपंचायत सदस्य तीर्थाबाई राऊत यांच्यासह गावातील सर्व प्रमुख पदाधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रस्तावनेत उपसरपंच कमलेश्वर रहांगडाले यांनी गावातील विविध विकासकामांची मांडणी केली. या नवनिर्मित सुसज्ज इमारतीमुळे ग्रामपंचायतीचे प्रशासकीय कामकाज अधिक लोकाभिमुख होण्यास मदत होईल, असा विश्वास ग्रामस्थांनी व्यक्त केला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन लिपिक बी. सी. बोपचे यांनी केले, तर उपस्थितांचे आभार ग्राम अधिकारी एस. बी. तुपटे यांनी मानले.

# ओबीसींचा रकाना नाही,तर जनगणना नाही

**गोंदिया** –आगामी जनगणना २०२६–२७ च्या दुसऱ्या टप्प्यात ओबीसी समाजासाठी स्वतंत्र रकाना समाविष्ट न केल्यास केंद्र सरकारविरोधात तीव्र संघर्ष छेडला जाईल आणि संपूर्ण जिल्ह्यात जनगणना कर्मचाऱ्यांसह अधिकाऱ्यांना ङ्गगावबंदीफ करून जनगणनेचे काम १०० टक्के रोखण्यात येईल, असा खणखणीत इशारा ओबीसी संघर्ष कृती समिती, गोंदिया जिल्हा यांच्या वतीने देण्यात आला आहे. यासंदर्भात आज १३ ऑगस्ट रोजी जिल्हाधिकारी मार्फत केंद्र शासनाला निवेदन देण्यात आले आहे.



जनगणना २०२६–२७ च्या पहिल्या टप्प्यात ङ्गओबीसींचा रकाना तरच जनगणनाफही अत्यंत ठाम आणि आक्रमक भूमिका घेत ओबीसी संघर्षकृती समितीच्या नेतृत्वात संपूर्ण गोंदिया जिल्ह्यात अभूतपूर्व आंदोलन उभारण्यात आले होते. याआंदोलनाला जनतेचा प्रचंड प्रतिसाद मिळाला होता आणि संपूर्ण जिल्ह्याने जनगणनेच्या कामावर बहिष्कार टाकला होता. या आंदोलनाची गंभीर दखल घेत जिल्हाधिकाऱ्यांनी

समितीच्या पदाधिकाऱ्यांसोबत सकारात्मक चर्चा घडवून आणली होती. या तडजोडीदरम्यान, ङ्गजनगणनेच्या दुसऱ्या टप्प्यात ओबीसी समाजासाठी स्वतंत्र रकाना समाविष्ट केला जाईल,असे लेखी आश्वासन प्रशासनाच्या वतीने देण्यात आले होते. प्रशासनाच्या या लेखी अश्वासनावरील विश्वासापोटी आणि ङ्गवेट अ‍ॅड वॉचफची भूमिका घेत संघर्ष समितीने आपले आंदोलन तात्पुरते स्थगित केले होते. मात्र, केंद्रीय गृह मंत्रालय यांच्या वतीने ३ ऑगस्ट २०२६ रोजी जारी करण्यात आलेल्या राजपत्र अधिसूचनेत पुन्हा एकदा ओबीसी समाजासाठी स्वतंत्र रकाण्याचा कोणताही उल्लेख करण्यात आलेला नाही. प्रशासनाच्या या दुटप्पी धोरणामुळे आणि दिलेल्या आश्वासनाची सर्रास पायमल्ली झाल्यामुळे संपूर्ण ओबीसी समाजात प्रचंड असंतोष आणि संतापाची लाट उसळली आहे. शासनाने दिलेले वचन न पाळल्याने ही ओबीसी समाजाची उघड–उघड फसवणूक असल्याचा आरोप समितीने केला आहे.

शासनाने आपल्या वचनावरून माघार घेतल्याचे स्पष्ट दिसताच ओबीसी संघर्ष कृती समितीने आपली भूमिका अधिक आक्रमक केली आहे. शासनाने तातडीने निर्णय न बदल्यास हे आदोलन संपूर्ण जिल्ह्यात व्यापक प्रमाणात राबवले जाईल. याअंतर्गत दुसऱ्या टप्प्यातील जनगणनेचे काम पूर्णपणे ठप्प केले जाईल, जनगणना अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना गावांमध्ये प्रवेश करू दिला जाणार नाही म्हणजेच थेट गावबंदीफ लागू केली जाईल. या आक्रमक भूमिकेमुळे जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्थेचा किंवा अन्य कोणताही प्रश्न निर्माण झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी शासन व जिल्हा प्रशासनाची असेल, असा स्पष्ट व सज्जड दमच या निवेदनाद्वारे देण्यात आला आहे. केंद्र सरकार व राज्य प्रशासन या इशाऱ्याची दखल घेऊन ओबीसींचा घटनात्मक हक्क असणारा स्वतंत्र रकाना जनगणनेत देणार, की गोंदियातून सुरू झालेला हा आंदोलनाचा भडका संपूर्ण राज्यात पसरणार, याकडे आता संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागून राहिले आहे.

निवेदन देतेवेळी ओबीसी संघर्ष कृती समितीचे जिल्हाध्यक्ष बबलू कटरे ओबिसी अधीकार मंचचे खेमेन्द्र कटरे, कार्याध्यक्ष अमर वराडे, जिल्हा सरचिटणीस शिशिर कटरे व मनोज मेंढे, कैलाश भेलावे, जिल्हा प्र. प्रमुख महेंद्र बिसेन, माजी सरपंच रवी पटले तसेच जीवनलाल शरणागत, सुनील भोंगाडे यांच्यासह जिल्हेतील अनेक प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

## गोंदिया जिल्ह्याला सर्वसमावेशक, सक्षम आणि विकसित जिल्हा बनविण्यासाठी सर्वांनी एकत्रितपणे योगदान देऊया : पालकमंत्री इंद्रनील नाईक

**गोंदिया :–** गोंदिया जिल्ह्याला सर्वसमावेशक, सक्षम आणि विकसित जिल्हा बनविण्यासाठी सर्वांनी एकत्रितपणे योगदान देऊया असे आवाहन उद्योग, सार्वजनिक बांधकाम, तंत्र व उच्च शिक्षण, आदिवासी विकास, पर्यटन, मृद व जलसंधारण विभागाचे राज्यमंत्री तथा गोंदिया जिल्ह्याचे पालकमंत्री इंद्रनील नाईक यांनी ८० व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त मुख्य ध्वजारोहण सोहळ्यात केले.



पोलीस मुख्यालय मैदान कारंजा येथे राष्ट्रध्वजारोहण समारंभाचे आयोजन करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी जिल्हाधिकारी मंदार पत्की, मुख्य कार्यकारी अधिकारी झेनीत दोन्तुला, अपर पोलीस अधीक्षक अभय डोंगरे, अपर जिल्हाधिकारी अभिजीत घोरपडे, उपवनसंरक्षक पवनकुमार जोंग उपस्थित होते. यासह विविध विभागातील वरिष्ठ अधिकारी, कर्मचारी, जिल्ह्यातील ज्येष्ठ नागरिक, नागरिक, पत्रकार, शाळेतील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

गोंदिया जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी शासन कटिबद्ध असल्याची ग्वाही पालकमंत्री श्री. नाईक यांनी यावेळी दिली. जिल्हा वार्षिक योजना २०२६–२७ अंतर्गत ४३८ कोटी २५ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली असून हा निधी शेती, सिंचन, आरोग्य, शिक्षण, रोजगार, पर्यटन आणि पायाभूत सुविधांच्या विकासासाठी खर्च करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

पालकमंत्री श्री. नाईक यांनी सांगितले, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेचा लाभ जिल्ह्यातील सुमारे ३० हजार शेतकऱ्यांना मिळणार असून, पहिल्या टप्प्यात १२ हजार ६७९ शेतकऱ्यांच्या खात्यात ७५.७४ कोटी रुपये जमा करण्यात आले आहेत.

खरीप हंगामात भात लागवडीसाठी ७४ हजार ६१३ हेक्टर क्षेत्राचे नियोजन करण्यात आले असून कृषी विभागाकडून सुधारित तंत्रज्ञानाचा प्रसार केला जात आहे. धान खरेदी केंद्रांमार्फत १.९८ लाख शेतकऱ्यांकडून ७५.५७ लाख क्विंटल धानाची खरेदी करण्यात आली असून १,५६९.१२ कोटी रुपयांचे चुकारे वितरित करण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली.

पर्यटन विकासावर भर देताना हाजराफॉलच्या विकासकामांचा उल्लेख करण्यात आला. यावर्षी जूनअखेरपर्यंत ८,५०० हून अधिक पर्यटकांनी या पर्यटनस्थळाला भेट दिली. याशिवाय सारस पक्ष्यांच्या गणनेत ३२ सारस पक्ष्यांची नोंद झाल्याने जिल्ह्याच्या जैवविविधतेचा गौरव वाढल्याचे त्यांनी नमूद केले.

आरोग्य क्षेत्रात गोंदिया जिल्ह्याने क्षयरोग निर्मूलनात सलग दुसऱ्या वर्षी राज्यात प्रथम क्रमांक पटकावल्याचा उल्लेख करण्यात आला. आयुष्मान भारत योजनेअंतर्गत ७.३७ लाख आयुष्मान कार्ड आणि ९.९० लाख आभा कार्ड वितरित करण्यात आली आहेत. ग्रामीण रोजगारासाठी व्ही.बी. जी–राम–जी अभियानांतर्गत १७.८८ लाख मनुष्यदिवसांची निर्मिती करण्यात आली असून पात्र कुटुंबांना १२५ दिवसांपर्यंत रोजगार उपलब्ध करून देण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

यावेळी पालकमंत्र्यांनी १५ ते २१ ऑगस्ट दरम्यान ङ्गजलसंधारण सप्ताहङ्ग उत्साहात साजरा करण्याचे आवाहन केले. तसेच ङ्गसबका साथ, सबका विकास, सबका विश्वासङ्ग या भावनेतून जिल्ह्याची वाटचाल करूया असे आवाहन श्री. नाईक यांनी यावेळी केले.

कार्यक्रमाचे नियोजन निवासी उपजिल्हाधिकारी भैय्यासाहेब बेहेरे यांच्या मार्गदर्शनात करण्यात आले. सुत्रसंचालन मंजुश्री देशपांडे यांनी केले. कार्यक्रमास माजी खासदार डॉ.खुशाल बोपचे व जि.प. बांधकाम सभापती डॉ.लक्ष्मण भगत उपस्थित होते.

# शासकीय कागदपत्रे पाहायलाही आता “फी” चा फटका; घरबसल्या नोंदणीसाठी ५ हजार!

## महाराष्ट्र शासनाचा नवा आदेश; सामान्य नागरिकांच्या खिशावर अतिरिक्त भार

**गोंदिया:**–जमिनीची कागदपत्रे, मालमत्तेच्या नोंदी किंवा नोंदणीशी संबंधित माहिती मिळिवण्यासाठी नागरिकांना आता अधिक पैसे मोजावे लागणार आहेत. महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाने ११ ऑगस्ट २०२६ रोजी जारी केलेल्या अधिसूचनेद्वारे नोंदणी विभागाच्या विविध सेवा व कागदपत्रांच्या प्रतींसाठीचे शुल्क सुधारित केले आहे. त्यामुळे आधीच महागाईच्या कचाट्यात सापडलेल्या सर्वसामान्य नागरिकांवर सरकारी कागदपत्रांसाठीही आर्थिक भार पडणार आहे.

नोंदणी अधिनियम, १९०८ मधील तरतुदींनुसार करण्यात आलेल्या या बदलानुसार संगणकीकृत प्रणालीमध्ये उपलब्ध असलेल्या एखाद्या विशिष्ट दस्तऐवजातील नोंद पाहण्यासाठी किंवा तिची तपासणी करण्यासाठी प्रत्येक नोंदीमागे ५० रुपये शुल्क आकारले जाणार आहे. संगणकीकृत प्रणालीमध्ये उपलब्ध असलेल्या प्रत्येक दस्तऐवज अथवा मालमत्तेशी संबंधित नोंदीसाठी दहा नोंदी किंवा त्याच्या काही भागासाठी ५०० रुपये शुल्क आकारण्याची तरतूद करण्यात आली आहे.

संगणकीकृत डिजिटल स्वाक्षरी असलेली प्रत (पीडीएफ आदी) मिळिवताना पहिल्या २० पानांसाठी १०० रुपये, तर त्यानंतरच्या प्रत्येक पानासाठी २ रुपये शुल्क आकारले जाणार आहे. कागदी स्वरूपातील प्रत स्कॅन केलेल्या प्रतिमेतून दिल्यास २५ रुपये प्रतिपान, तर अन्य प्रकारच्या अभिलेखाची छायांकित प्रत दिल्यासही २५ रुपये प्रतिपान शुल्क राहणार आहे.

याशिवाय इंडेक्स क्रमांक १, २, ३ किंवा ४ ची संगणकीकृत डिजिटल स्वाक्षरी असलेली प्रत मिळिवण्यासाठी २५ रुपये, तर कागदी प्रत मिळिवण्यासाठी ५० रुपये शुल्क निश्चित करण्यात आले आहे.

जमीन खरेदी–विक्री, वारसाहक्क, कर्जप्रकरणे, मालमत्ता व्यवहार किंवा न्यायालयीन कामांसाठी नागरिकांना अनेकदा जुन्या नोंदी, दस्तऐवज आणि इंडेक्सच्या प्रती आवश्यक असतात. अशा वेळी एकापेक्षा अधिक नोंदी शोधाव्या लागल्यास शुल्काचा बोजा झपाट्याने वाढण्याची शक्यता आहे. विशेषतः ग्रामीण भागातील शेतकरी, छोटे जमीनधारक, वारसाहक्काच्या प्रकरणातील कुटुंबे आणि मर्यादित उत्पन्न असलेल्या नागरिकांना याचा फटका बसू शकतो.

शासकीय अभिलेख हे जनतेच्या मालमत्ता व हक्कांशी संबंधित मूलभूत दस्तऐवज आहेत. त्यांची माहिती मिळिवणे ही नागरिकांची गरज आहे. त्यामुळे अशा मूलभूत माहितीसाठी शुल्कवाढ करताना शासनाने सामान्य नागरिकांचा आर्थिक भार किती वाढेल, याचा विचार केला आहे का, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

### कार्यालयात न जाता अधिकाऱ्याला घरी बोलावले तर ?५ हजार!

**या अधिसूचनेतील सर्वाधिक चर्चेचा विषय म्हणजे नोंदणी कार्यालयाऐवजी खासगी निवासस्थानी किंवा कारागृहात जाऊन नोंदणीची प्रक्रिया पार पाडण्यासाठी प्रत्येक वेळी ५ हजार रुपये शुल्क निश्चित करण्यात आले आहे. म्हणजेच कार्यालयीन यंत्रणा नागरिकांच्या दारात गेल्यास त्याची किंमत थेट ५ हजार रुपये मोजावी लागणार आहे. अर्थात, काही पात्र व्यक्तींना नोंदणी कार्यालयात उपस्थित राहण्यापासून सूट असली, तरी अशा व्यक्तींशी संबंधित सर्व दस्तऐवजांसाठी घरभेटीचे शुल्क आकारण्याची तरतूद अधिसूचनेत करण्यात आली आहे.**

### “डिजिटल महाराष्ट्र”च्या नावाखाली शुल्काचा नवा भार?

**सरकारकडून सातत्याने शासकीय सेवा ऑनलाइन, पारदर्शक आणि नागरिकांच्या दारात पोहोचविण्याचा दावा केला जातो. मात्र, डिजिटल प्रणालीमध्ये उपलब्ध असलेली माहिती पाहण्यासाठीच नागरिकांकडून शुल्क आकारले जाणार असल्याने ङ्गडिजिटल सेवाफही सुविधा की महसूल मिळिवण्याचे नवे साधन? असा प्रश्न सर्वसामान्य नागरिकांकडून उपस्थित होऊ लागला आहे.**

### बँकांच्या शोधासाठी मात्र स्वतंत्र तरतूद

**अधिसूचनेनुसार जमीन विकास बँका आणि व्यावसायिक बँकांनी केलेल्या शोधासाठी, अर्जातील मालमत्तांची संख्या कितीही असली तरी प्रत्येक अर्जासाठी १५ रुपये या समान दराने शोध शुल्क आकारले जाणार आहे. त्यामुळे बँकांच्या शोधप्रक्रियेसाठी स्वतंत्र शुल्कदर कायम ठेवण्यात आला आहे.**

**शासकीय नोंदी ऑनलाइन उपलब्ध करून देणे म्हणजे सुविधा. पण त्या नोंदी पाहण्यासाठी आणि प्रती मिळिवण्यासाठी पुन्हा शुल्क आकारले जात असेल, तर डिजिटल सुविधेचा फायदा सामान्य नागरिकांना किती? सरकारने शुल्कवाढीऐवजी नागरिकांना सहज आणि परवडणाऱ्या दरात माहिती उपलब्ध करून देण्याचा विचार करायला हवा.**

**–राजकुमार पटले, कृ.उ.बा.स. उपसभापती, गोंदिया**

एकीकडे ङ्गईज ऑफ लिव्हिंगफचा नारा आणि दुसरीकडे सरकारी नोंदी पाहण्यासाठी वाढते शुल्कङ्ग या विरोधाभासावर शासनाने स्पष्टीकरण द्यावे, अशी मागणी नागरिकांकडून होण्याची शक्यता आहे. पारदर्शकता आणि डिजिटल सुलभतेच्या नावाखाली माहितीपर्यंत पोहोचणेच महाग केले जात असेल, तर त्याचा सर्वाधिक फटका आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांनाच बसणार असल्याची भीती व्यक्त होत आहे.

### महिलांची छेड काढून अश्लील इशारे करणाऱ्यांवर कठोर कारवाई करा

**गोंदिया :** गावातील महिलांची नेहमीच छेड काढून अश्लील इशारे करणाऱ्यावर कठोर कारवाई करा अशी मागणी तालुक्यातील लोधीटोला (चुटिया) येथील महिलांनी पत्रकार परिषदेतून केली आहे. अनेक दिवसांपासून लोधीटोला येथील रितिक संजय ठाकरे, गुंजन संजय ठाकरे, विकेश भैयालाल गावराने हे युवक गावातील महिलांना पाहून असभ्य वागणूक करीत असतात असा आरोप केला आहे.

## ग्रामपंचायत दवडीपारचा स्तुत्य उपक्रम: अंगणवाडीमध्ये सीबीएससी अभ्यासक्रमाचा शुभारंभ!

**गोरेगाव:**–ग्रामीण भागातील बालकांना दर्जेदार आणि अत्याधुनिक शिक्षण मिळावे या उद्देशाने ग्रामपंचायत दवडीपार यांच्या विशेष पुढाकाराने दि. १३ ऑगस्ट २०२६ रोजी अंगणवाडी ३ मध्ये ङ्गसीबीएससीफ अभ्यासक्रमाचा औपचारिक शुभारंभ करण्यात आला.



या महत्त्वपूर्ण कार्यक्रमाचे उद्घाटन श्रीमती सी. एम. मेंढे (बालविकास प्रकल्प अधिकारी, एकात्मिक बालविकास प्रकल्प, गोरेगाव) यांच्या शुभहस्ते पार पडले. ग्रामीण भागातील अंगणवाड्यांमध्ये अशा प्रकारचा आधुनिक अभ्यासक्रम सुरू झाल्याबद्दल त्यांनी ग्रामपंचायतीच्या या उपक्रमाचे मनापासून कौतुक केले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बी. एम. कटरे (सरपंच, ग्रामपंचायत दवडीपार) हे होते. तसेच प्रमुख अतिथी म्हणून साहेबलाल रमेश बिसेन (उपसरपंच),श्रीमती कांताताई सापरकर (पर्यवेक्षिका),श्री कोटांगले (अधीक्षक),या सर्व मान्यवरांनी उपस्थित राहून अंगणवाडीतील बालकांना व कर्मचाऱ्यांना शुभेच्छा दिल्या.या प्रसंगी ग्रामपंचायतीचे सर्व सन्माननीय सदस्य, अंगणवाडी सेविका आणि मदतनीस मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

अंगणवाडीतील चिमुकल्यांना आतापासूनच सीबीएसई पॅटर्ननुसार शिक्षण मिळणार असल्याने पालकांमध्ये आनंदाचे व उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले. ग्रामीण भागातील शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी दवडीपार ग्रामपंचायतीने उचललेले हे पाऊल अत्यंत कौतुकास्पद ठरत आहे.

## ढासगड येथे पाण्यात बुडून दोन युवकांचा मृत्यू

**गोंदिया :–** देशात स्वातंत्र्य दिनाचा सोहळा आनंदात साजरा होत असताना देवरी तालुक्यातील ढासगड या पर्यटनस्थळी साडे तीन वाजेच्या सुमारास एक अप्रिय घटना घडली. या घटनेत प्रचंड वेग असलेल्या पाण्याच्या प्रवाहात आंधोळीचा मोह न आवरता आलेल्या दोन युवकांना आपला जीव गमवावा लागला. मृतांमध्ये कृष्णा लखन कापगते (वय २१ वर्षे) आणि हेतराम गुलाब सयाम (वय २५ वर्षे) दोन्ही राहणार बोपाबोडी, तालुका सडक अर्जूनी यांचा समावेश आहे.

ढासगड येथे नेहमी पर्यटकांची गर्दी असते. आज स्वातंत्र्यदिन सोहळा असल्याने पर्यटनासाठी प्रचंड गर्दी उसळली होती. यात युवक मंडळी मोठ्या प्रमाणावर होती. ढासगड येथे नैसर्गिक सौदर्याची भरमार असून पाण्याचा धबधबा सुद्धा आहे. येथे खडकाळ भागातून प्रचंड वेगाने पाण्याचा झरा वाहतो. हा भाग प्रचंड जोखमीचा असून यापूर्वी अनेक घटना घडल्याने पोलिस प्रशासन आणि स्थानिक लोकांकडून पर्यटकांना वाहत्या पाण्यात खेळ वा आंधोळीसाठी सातत्याने मनाई केली जाते. पण या सूचनेकडे आजची तरूणानी नेहमी कानाडोळा करत आल्याने अनेक कुटुंबावर याचे परिणाम भोगण्याची दुर्दैवी वेळ आलेली आहे. आजही सर्वत्र आनंदाचे वातावरण असताना कृष्णा आणि हेतराम हे विसीतले तरूण बेधुंद होऊन आंधोळीसाठी पाण्यात उतरले. पाण्याचा प्रवाह वेगवान असल्याने ते दोघेही पाण्यात वाहून गेले.

# नवीन आकृतिबंधावर कृषी अधिकारी संघटनांचा आक्षेप

**गोंदिया :–** महाराष्ट्र राज्य कृषी अधिकारी संघटना, उपकृषी अधिकारी संघटना व सहाय्यक कृषी अधिकारी संघटना यांनी राज्य शासनाच्या कृषी विभागासाठी प्रस्तावित करण्यात आलेल्या नवीन आकृतिबंधाबाबत तीव्र आक्षेप नोंदविला आहे. कृषी विभागाची प्रमुख जबाबदारी ही शेतकरी, शेती व ग्रामीण भागाशी संबंधित तांत्रिक कामांची असल्याने प्रस्तावित आकृतिबंधामध्ये क्षेत्रीय स्तरावरील तांत्रिक संवर्गाला पुरेसे महत्त्व देण्यात यावे, अशी मागणी संघटनेने केली आहे.



प्रस्तावित आकृतिबंधामध्ये प्रशासकीय संवर्गातील पदांना तुलनेने अधिक महत्त्व देण्यात आल्याचे संघटनेने निदर्शनास आणून दिले आहे. कृषी विभागाचे मुख्य कार्य हे शेती क्षेत्राशी संबंधित तांत्रिक स्वरूपाचे असल्याने तांत्रिक संवर्ग मजबूत करणे आवश्यक आहे. त्यामुळे आकृतिबंधामध्ये क्षेत्रीय स्तरावर काम करणाऱ्या तांत्रिक पदांची संख्या वाढविण्याची मागणी करण्यात आली आहे.

कृषी विभागाच्या विविध कार्यालयांमध्ये अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या पदांची रचना करताना प्रत्यक्ष कामाचे स्वरूप, शेतकऱ्यांची संख्या, भौगोलिक क्षेत्रफळ आणि योजनांची संख्या यांचा विचार करावा, अशी मागणीही संघटनेने केली आहे.नवीन आकृतिबंधाला अंतिम मंजुरी देण्यापूर्वी कृषी विभागातील सर्व संबंधित घटकांशी चर्चा करून त्यातील त्रुटी दूर कराव्यात, अशी भूमिका संघटनेने मांडली आहे. शेतकरी व शेती क्षेत्राच्या हितासाठी तांत्रिक मनुष्यबळ सक्षम असणे अत्यंत आवश्यक असल्याचे संघटनेने स्पष्ट केले आहे.

प्रस्तावित आकृतिबंधात आवश्यक त्या सुधारणा करूनच तो लागू करावा, अन्यथा तांत्रिक संवर्गावर अन्याय होण्याची शक्यता असल्याचे संघटनेने म्हटले आहे. मागण्यांचा गांभीर्याने विचार न झाल्यास संघटनेतर्फ तीव्र आंदोलन करण्याचा इशाराही देण्यात आला आहे. कृषी विभागाचा आकृतिबंध हा केवळ पदांची संख्या निश्चित करणारा नसून, राज्यातील शेतकऱ्यांना मिळणाऱ्या तांत्रिक सेवांचा दर्जा आणि प्रभावी अंमलबजावणी निश्चित करणारा असल्याने त्याचा सर्वंकष पुनर्विचार करावा, अशा मागणीचे निवेदन महाराष्ट्र राज्य कृषी अधिकारी संघटना, उपकृषी अधिकारी संघटना व सहाय्यक कृषी अधिकारी संघटना यांनी इंद्रनीलजी नाईक पालकमंत्री गोंदिया यांना सादर केले आहे.

### क्षेत्रीय स्तरावर तांत्रिक मनुष्यबळाची गरज

कृषी विभागाच्या योजनांची अंमलबजावणी, पीक पाहणी, शेतकऱ्यांना तांत्रिक मार्गदर्शन, निविष्ठांची गुणवत्ता नियंत्रण, पीक उत्पादनवाढ, हवामानाशी संबंधित उपाययोजना आणि विविध शासकीय योजनांचे संनियंत्रण यासाठी पुरेसे तांत्रिक अधिकारी उपलब्ध असणे आवश्यक आहे. मात्र, क्षेत्रीय स्तरावर तांत्रिक संवर्गातील पदांची कमतरता असल्याने प्रत्यक्ष कामाचा ताण वाढत असल्याचा दावा संघटनेने केला आहे.